www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी





मुख्य संपादक – सौ भारती संतोष आमले उपसंपादक – श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक – श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक – श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ | अंक : 286 | वा सोमवार दि. 30 जून २०२५ | किंमत : 2 रु | पृष्ठ : ४

# हिंदी भाषेसंदर्भातील दोन्ही शासन निर्णय रद्द; राज-उद्धव यांच्या मोर्चाआधीच CM फडणवीसांची मोठी घोषणा

पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना तिसरी भाषा हिंदी शिकवण्याच्या मुद्द्यावरुन राज्यातील वातावरण तापलेलं असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठा निर्णय घेतला आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत हिंदी भाषेबाबतचा निर्णय मागे घेण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. पावसाळी अधिवेशनापूर्वी मुख्यमंत्र्यांची पत्रकार परिषदपार पडली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी त्रिभाषा धोरणाचा जीआर रद्द केल्याची घोषणा केली आहे. त्रिभाषा सूत्राच्या संदर्भात कुठल्या वर्गापासून लागू करावी यासाठी राज्य सरकारच्या वतीने डॉ नरेंद्र जाधव यांच्या नेतृत्वाखाली समिती स्थापन करणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितले. या समितीच्या अहवालानंतर त्रिभाषा सूत्र लागू करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. केंद्र सरकारच्या नव्या शैक्षणिक आराखड्यातील तरतुदींनुसार महायुती सरकारने मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये पहिली ते पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना हिंदी तिसरी भाषा म्हणून शिकवण्याचा निर्णय जाहीर केला होता. पाचवी किंवा सहावीनंतर येणारा हिंदी भाषेचा विषय पहिलीपासूनच शिकवण्यात येणार असल्याने विरोधकांनी यावर संताप व्यक्त केला होता. मनसे आणि उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने हा मुद्दा उचलून धरत याविरोधात आंदोलन उभं करुन मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र त्याआधीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिंदी भाषेसंदर्भातील त्रिभाषा सूत्राचे दोन्ही शासन निर्णय रद्द करत असल्याची घोषणा केली आहे.



हिंदी भाषा आणि त्रिभाषा सूत्राच्या मुद्द्यावरुन राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. पावसाळी अधिवेशनाच्या आधी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत सरकारने दोन्ही जीआर हे रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. त्रिभाषा सूत्राच्या संदर्भात डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात येणार असून त्याच्या अहवालानंतर याबाबत निर्णय घेतला जाईल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. आमच्यासाठी मराठी भाषा आणि मराठी मुलगा महत्त्वाचा आहे, असंही मुख्यमंत्री म्हणाले.

"त्रिभाषा सूत्राच्या संदर्भात ही भाषा कुठल्या वर्गापासून लागू करावी याचा निर्णय करण्याकरता राज्य सरकारच्या वतीने डॉक्टर नरेंद्र जाधव यांच्या नेतृत्वात एक समिती तयार करण्यात येईल. समितीचा अहवाल आल्यानंतरच त्रिभाषा सूत्र लागू केलं जाईल. त्यामुळे १६ एप्रिल आणि १७ जून रोजी काढण्यात आलेले दोन्ही शासन निर्णय आम्ही रद्द करण्याचा निर्णय घेतलेला आहे. आम्ही दोन्ही शासन निर्णय रद्द करत आहोत. नव्याने तयार करण्यात आलेली समिती त्रिभाषा संदर्भातील सर्व सूत्रे, माशेलकर समितीचा अहवाल, तसेच ज्यांचे दुमत आहे त्यांचे म्हणणे ऐकून घेईल. त्यानंतर आपल्या विद्यार्थ्यांच्या हितासाठी काय निर्णय योग्य आहे तो राज्य सरकार स्वीकारेल. त्यानुसार पुढची कारवाई केली जाईल. आमच्यासाठी मराठी आणि मराठी विद्यार्थी हे महत्त्वाचे आहेत. आमची नीती मराठी केंद्रित असेल," असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# दृष्य सत्य

## जनतेच्या नजरेतून शासनाच्या दरबारात

## कचऱ्याचा डोंगर – दत्तनगरच्या आरोग्यावर घाला!

### नागरिकांचा सवाल:

"आम्ही कर भरतो, आरोग्याच्या बदल्यात कचऱ्याचे ढिग आणि डुकरांची दहशत का?"




**स्थान: मुरुड, दत्तनगर – वॉर्ड क्र. १**
**प्रतिनिधी: मोहम्मद पिंजारी, लातूर**

**फोटोतून शासनदरबारी आवाज पोहोचवत आहेत दैनिक व आधारचे पत्रकार मोहम्मद पिंजारी**

"दत्तनगरच्या मुख्य रस्त्यालगत ठिकठिकाणी साचलेले कचऱ्याचे ढिग व डुकरांचा वाढता वावर ही केवळ घाण नव्हे, तर नागरिकांच्या आरोग्यावरचा गंभीर आघात आहे! डास, दुर्गंधी आणि संसर्गजन्य रोगांच्या छायेत जगणारे नागरिक प्रशासनाकडून केवळ 'बघ्याची भूमिका' अनुभवत आहेत."

**प्रशासन जागे होईल तेव्हा होईल... पण तोपर्यंत ही सत्य दृश्यं शासनाच्या दरबारात पोहोचवणे हीच आमची जबाबदारी.**

## पाटोदा नगरीत राष्ट्रसंत ऐश्वर्यसंपन्न संत भगवान बाबा यांच्या पालखी सोहळ्याचे भव्य दिव्य स्वागत!

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** – राष्ट्रसंत, ऐश्वर्यसंपन्न संत भगवान बाबा श्री क्षेत्र भगवान गड यांच्या पालखीचे पाटोदा शहरात आगमन होताच संपूर्ण शहर भक्तिरसात न्हालं. ढोल–ताशांचा गजर, टाळ–मृदुंगांचा निनाद, आणि भक्तांच्या गजरांनी आसमंत दुमदुमून गेला. सर्वत्र श्रद्धा, आनंद आणि अध्यात्मिक उर्जा भरून राहिली होती. जसे की संतांचे स्वागत नव्हे, तर भक्तीचा महोत्सव !पाटोदा शहरात सकाळ पासूनच उत्सवाचे वातावरण होते. सकाळी १०.३० वाजता पालखीने पाटोदा नगरीत प्रवेश केला. हजारो भाविक रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून 'राष्ट्रसंत भगवान बाबा' च्या घोषणांनी स्वागत करत होते. पाटोदा शहर भगव्या पताकांनी, पुष्पसजावट आणि आकर्षक रांगोळ्यांनी सजले होते. महिलांनी औक्षण करून, फुलांची अर्घ्ये वाहून, पारंपरिक पोशाखात भक्ती भावाने स्वागत केले. तर युवकांनी ढोल–ताशांच्या लयीत नृत्य करत भक्तीचा उत्सव उभारला. आस्थेने साकारलेले नियोजन, सेवाभावी हातांची साथ सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी पाटोदा नगर पंचायत, पोलीस प्रशासन, वैद्यकीय सेवा, स्वयंसेवक आणि सामाजिक संस्थांनी एकत्रितपणे अतुलनीय कार्य केले. वाहतूक, स्वच्छता, पाणीपुरवठा, अन्नछत्र, महाप्रसाद आदी सर्व व्यवस्था उत्तम प्रकारे पार पाडण्यात आल्या कोणती ही अडचण न येऊ देता संपूर्ण सोहळा अत्यंत शिस्तबद्धपणे पार पडला. पाटोदा नगरीचा सुवर्णक्षण राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या पालखीचे पाटोदा नगरीतील आगमन हा केवळ धार्मिक कार्यक्रम नव्हता, तर तो संपूर्ण शहरासाठी एक आध्यात्मिक महोत्सव होता. हा दिवस नगरीच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरला जाईल, अशी भावना अनेक भाविकांनी व्यक्त केली. संतांचे पावन चरण स्पर्शल्याने संपूर्ण पाटोदा अध्यात्मिक उर्जेने भारावले होते.



## शेतकऱ्यांना युरिया व इतर खते तातडीने उपलब्ध करून देण्यासाठी प्रभावी उपाययोजना करा- आ. अब्दुल सत्तार

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड** :- शेतकऱ्यांना युरिया व इतर खत तातडीने उपलब्ध करून देण्यासाठी प्रभावी उपाययोजना करा. पीक कर्जाचे उद्दिष्ट पूर्ण करा, विकास कामांना गती देवून विकास कामे निर्धारित वेळेत पूर्ण करा

युरिया खताचा होणारा तुटवडा पाहता यावेळी आमदार अब्दुल सत्तार यांनी विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्याशी भ्रमनध्वनीवर संवाद साधला. सिल्लोड – सोयगाव तालुक्यात यंदा मका पिकाचे लागवड क्षेत्र वाढल्याने युरीया खताची मागणी वाढली. त्यामुळे मागणीनुसार शेतकऱ्यांना तातडीने युरिया खताची उपलब्धता करून द्यावी असे आमदार अब्दुल सत्तार विभागीय आयुक्तांना म्हणाले.

अशा सूचना आमदार अब्दुल सत्तार यांनी शासकीय यंत्रणेला दिल्या.



सिल्लोड तहसील कार्यालयात मतदारसंघातील खरीप पीक परिस्थिती, खते औषधी उपलब्धतेबाबत तसेच विकास कामांबाबत आमदार अब्दुल सत्तार यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली. यावेळी आमदार अब्दुल सत्तार यांनी वरील निर्देश दिले. या बैठकीस उपविभागीय अधिकारी लतीफ पठाण, तहसीलदार सतीश सोनी ( सिल्लोड ), तहसीलदार मनीषा मेने ( सोयगाव ), उपविभागीय कृषी अधिकारी सुभाष आघाव , सिल्लोड न.प. चे मुख्याधिकारी तथा प्रशासक कारभारी दिवेकर, जलसंधारण विभागाचे उपविभागीय अभियंता राजधर दांडगे, तालुका कृषी अधिकारी प्रमोद डापके, तालुका कृषी सेवा केंद्राचे अध्यक्ष नरेंद्र ( बापू ) पाटील, यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, विविध बँकेचे व्यवस्थापक, खत, बियाणे विक्रेत्यांची उपस्थिती होती. पीक कर्जाचे उद्दिष्ट निम्यापेक्षा कमी झाल्याचे पाहून आमदार अब्दुल सत्तार यांनी बँक व्यवस्थापकांना चांगलेच धारेवर धरत खडेबोल सुनावले. पीक कर्जासाठी बांकांकडून शेतकऱ्यांची होणारी अडवणूक पिळवणूक खपून घेणार नाही असे आमदार अब्दुल सत्तार म्हणाले. पीक कर्जाची मागणी करणारा एकही पात्र शेतकरी पीक कर्जापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्या तसेच येत्या 7 दिवसांत पीक कर्जाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करा असे निर्देश आमदार अब्दुल सत्तार यांनी बँक अधिकाऱ्यांना दिले.

# 29 जून रोजी जॉब इंटरव्यूचे आयोजन, रोजगारासाठी भाजपचा पुढाकार"



**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : पनवेल, नवी मुंबई, मुंबई परिसरामध्ये नोकरीच्या अनेक संधी तरुणांसाठी उपलब्ध आहेत. त्याचेच एक पाऊल म्हणून भारतीय जनता पार्टी प्रितम जनार्दन म्हात्रे जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून 29 जून रोजी जॉब इंटरव्यूचे आयोजन करण्यात आले आहे. 29 जून रोजी सकाळी दहा ते तीन वाजेपर्यंत जॉब इंटरव्यूचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी बायकर, बॅक ऑफिस, ऑपरेशन स्टाफ, पिकर पॅकर, फिल्ड ऑडिटर, डिलिव्हरी एक्झिक्यूटिव्ह, सपोर्ट स्टाफ, व्हॅन बॉय, काउंटर स्टाफ इन्स्टॉलर /हेल्पर, फार्मासिस्ट या पदासाठी जॉब इंटरव्यू होणार आहे. पनवेल शहरातील भारतीय जनता पार्टी प्रितम जनार्दन म्हात्रे जनसंपर्क कार्यालय, गुरु शरणम कॉम्प्लेक्स, विश्राळी नाका, मार्केट यार्ड येथे या जॉब इंटरव्यूचे आयोजन करण्यात आले आहे.

आपल्या परिसरात विकासासोबतच नव्याने उद्योगधंदे येत आहे त्याप्रमाणे रोजगार सुद्धा वाढत आहे. यावेळी आपल्या विभागातील तरुणांना संधी मिळावी या उद्देशाने आम्ही भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून पुढाकार घेतला आहे.

**– प्रितम जनार्दन म्हात्रे, माजी विरोधी पक्षनेते पनवेल महानगरपालिका**



## लाकडी काठीने मारहाण केल्याप्रकरणी दोघांविरोधात गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

लाकडी काठीने मारहाण केल्याने 32 वर्षीय वॉचमेन जखमी झाला. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात 27 जून रोजी अमित सिंग आणि अनोळखी ईसमाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

घनश्याम कुमार चौधरी हा खारघर येथे राहत असून ते कस्तुरी हाईट सोसायटी सेक्टर 10 खारघर येथे वॉचमेन म्हणून काम करतात. 26 जून रोजी रात्री साडेदहाच्या दरम्यान ते नोकरी करत असताना अमित सिंग व त्याचा अनोळखी मित्र हे दोघे त्या ठिकाणी आले आणि तुझ्यामुळे माझी व रवी दोघांमध्ये भांडण झाली असल्याचे बोलला. यावेळी दोघांनी सिक्युरिटी सारखी वापरणारी लाकडी काठीने घनश्याम यांना मारहाण केली या घनश्याम जखमी झाले.

## डोक्यात दगड मारून गेले जखमी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

घराचा दरवाजा वाजवल्याचे कारण विचारले असता अमरसिंग काळू तोमर याने 49 वर्षीय इसमास मारहाण करून डोक्यात दगड मारून जखमी केले. या प्रकरणी अमरसिंग तोमर याच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात 27 जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. विठ्ठल रामदास गोंधळी हे धानसर गावात राहत असून 26 जून रोजी ते घरामध्ये झोपले होते. रात्री दोनच्या सुमारास घराच्या पाठीमागील दरवाजा कोणीतरी वाजवत असल्याने ते झोपेतून उठले आणि दरवाजा उघडला असता दोन ईसम उभे दिसले. त्यांना काय काम आहे असे विचारले असता त्यांनी मारहाण केली. यावेळी एका इसमाला पकडण्यात आले तर दुसरा ईसम पळून गेला. त्यांच्यात झटापट चालू असताना त्या इसमाने दगड घेऊन विठ्ठल गोंधळी यांना डोक्यात आणि पाठीवर मारले. यात ते जखमी झाले. यावेळी पोलिसांना फोन केल्यानंतर पोलिसांनी मारहाण करणाऱ्या ईसमाला ताब्यात घेतले. अमरसिंग काळू तोमर याच्यावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

## दोन चैन जबरीने खेचून दोघेजण गेले पळून

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

शिवीगाळ केल्याने विचारणा केली असता एकाने कॉलर पकडली आणि दुसऱ्याने गळ्यातील दोन चैन जबरीने खेचून ते दोघेजण पळून गेल्याप्रकरणी दोघांविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात 26 जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. उदयसिंग खरवड हे सेक्टर चार, नवीन पनवेल येथे राहत असून 25 जून रोजी रात्री सव्वा अकराच्या सुमारास ते जलाराम हॉटेल येथून जेवण करून घरी जाण्यासाठी अंबामाता मंदिर, मनसे मैदान, सेक्टर दोन, नवीन पनवेल येथून जात होते. रात्री साडेअकराच्या सुमारास दोन इसम सिगारेट पीत होते. त्यांनी विनाकारण शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यांना शिवीगाळ करण्याचे कारण विचारण्यासाठी जवळ गेले असता एकाने त्यांची कॉलर पकडली. आणि दुसऱ्या इसमाने त्यांच्या गळयातील दोन सोन्याचे चैन जोरात खेचून घेतल्या आणि त्यांना धक्का देऊन खाली पडले आणि ते दोघेही पळून गेले. त्यावेळी आरडाओरडा केला मात्र रात्र असल्याने कोणीही मदतीला आले नाही. पोलिसांना कॉल केला असता पोलीस त्या ठिकाणी आले.

## शेठला मुलगा झाल्याचे सांगून सोन्याचे दागिन्यांची चोरी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

शेठला मुलगा झाला असून ते रेशन वाटत आहे असे सांगून बोलण्यात गुंतवून 58 वर्षीय महिलेकडील सोन्याचे मंगळसूत्र व कानातील दोन कर्णफुले फसवणूक करून घेऊन गेल्याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. विमल चिकणे या कामोठे, सेक्टर 34 येथे राहत असून त्या 24 जून रोजी सायंकाळी भाजीपाला घेण्यासाठी बाहेर निघाल्या. गणेश मंदिरा जवळ असताना त्यांच्याजवळ दोन इसम आले आणि त्यांनी शेठला मुलगा झाला असून ते मोफत रेशन वाटत असल्याचे त्यांना सांगितले. यावेळी रस्त्याच्या पलीकडे दुसऱ्या माळ्यावर राशन वाटप सुरू असल्याचे सांगितले. त्यामुळे त्या रस्ता ओलांडून पलीकडच्या बाजूला गेल्या. यावेळी सगळे दागिने काढून ठेवा, अंगावर दागिने असतील तर ते तुम्हाला आत मध्ये घेणार नाही व राशन मिळणार नाही असे सांगितले. त्यामुळे त्यांनी सोन्याचे मंगळसूत्र व कानातील सोन्याची फुले कापडी पिशवीत ठेवले. यावेळी त्यांनी पार्ले बिस्कीटचे पुडे दिले आणि बिस्कीट आधी घ्या नंतर रेशन देतो असे सांगितले. त्यावेळी तुमचा नंबर आला आहे असे म्हणताच त्या घाई घाईने उठल्या आणि पुढे चालू लागल्या. इतक्यात त्यातील एका इसमाने दागिन्यांची पिशवी व बिस्किटाची पिशवी त्यांच्याकडून काढून घेतली. त्या चालू लागताच दोघेही रस्त्याच्या बाजूला पळून गेले.

## मुरबाड तालुक्यातील म्हाडस सजेच्या तलाठीचा मदतनीस ए सी बी च्या जाळ्यात

**प्रतिनिधी.गौरव खरे**

**मुरबाड प्रतिनिधी**



मुरबाड तालुक्यातील म्हाडस तलाठी सजेच्या तलाठी श्रीमती.वैशाली रामभाऊ गडदे यांनी मौजे बांधिवली येथे राहणारे श्री.एकनाथ नामदेव भोईर यांच्याकडे वडिलोपार्जित जमिनीचा फेरफार नोंद करण्यासाठी 2000रुपयाची लाच मागितली होती. एकनाथ भोईर हे गरीब शेतकरी कुटुंबातील असुन ते माहिती अधिकार महासंघाचे प्रतिनिधी म्हणुन काम करतात.एकनाथ भोई हे आपले जमिनीचे काम होत नसल्याने गेले कित्येक दिवस तहसील ऑफिस मुरबाड येथे फेऱ्या मारत होते. संबधित तलाठी वैशाली गडदे व मदतनीस बाळु एगडे या दोघांकडुन काम करण्यास टाळाटाळ होत होती.श्री.एकनाथ भोईर हे जमिनीचे काम होत नसल्यामुळे अखेर वैतागून त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे यांच्याकडे संबंधित तलाठी यांची तक्रार केली.त्यानुसार शुक्रवार दिनांक.27जुन 2025रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मुरबाड तहसील कार्यालयाच्या आवरात सापळा लावला होता.परंतु स्वतः लाच घेण्यासाठी वैशाली गडदे ह्या न येता त्यांनी त्यांचा खाजगी मदतनीस बाळु येगडे यांना सदर लाच स्वीकारण्यास सांगितले. सदरच्या फिर्यादीने बाळु येगडे या मदतनीसकडे 2000रुपयाची लाच दिली असता लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने त्याला रांगेहात पकडले असुन चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे.व सदर घटनेचा रीतसर पंचनामा मुरबाड पोलीस स्टेशनमध्ये करण्यात आला.तसेच प्रथम आरोपी म्हणुन वैशाली गडदे व दुसरा आरोपी बाळु एगडे यांच्यावर भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलम 7,7अ,12 नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे.दरम्यान बाळु एगडे हा पोलिसांच्या ताब्यात असुन मुख्य आरोपी श्रीमती.वैशाली गडदे यांचे मुरबाडमधील राहते घर सील करण्यात आले असुन लाचालुचपत प्रतिबंधक पथक त्यांचा शोध घेत आहे.

# मोठी जुई येथील "साथी" म्हणजे गावात येणाऱ्या रोगराई व संकटावरील काटेरी कुंपण.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**

प्रत्येक गावच्या रुढी म्हणजे गावांमध्ये पूर्वापार चालत आलेल्या चालीरीती आणि परंपरांमध्ये सण ,उत्सव ,लग्न अशा अनेक प्रथा येत असतात.गावच्या रुढीमुळे गावात एकोपा व सामुदायिक भावना टिकून राहते. दिवाळी, होळी , दसरा, गणेशोत्सव ,गोविंदा गावची जत्राअशा अनेक सण उत्सवामुळे, पूजा अर्चा, पारंपारिक गाणी, नाच, खेळ अशा या गावच्या रूढींमुळे तर खऱ्या अर्थाने गावची विशिष्ट ओळख निर्माण होते .आणि लोकांमध्ये एकतेची भावना वाढीस लागते.

असेच एक उरण तालुक्यातील गाव मोठी जुई या गावाच्या नावातच या गावची खरी ओळख आणि गावची श्रीमंती आहे. "मो "म्हणजे मोठ्या मनाची माणसे, "ठ" म्हणजे ठिसूळ दगडांवर वसलेली,"जु " म्हणजे जुन्या रूढी परंपरा जपणारी, आणि" ई" म्हणजे ईश्वर प्रेमी. अशा या गावात सण उत्सव म्हणजे गावच्या प्रत्येक व्यक्ती साठी एक आनंदोत्सवच असतो. हे गाव तस विस्ताराने फार मोठे आहे . जवळजवळ शेती जमीन व मिठागरे पकडून साडेसोळाशे एकर जमिनीवर वसलेले हे गाव आहे. शेतीवर उदरनिर्वाह करणारा हे गाव आहे.जोडीला मच्छीमारी ही केली जाते.

अशा या सुंदर गावची एक परंपरा फार आगळीवेगळी देवभोळी, भक्ती रुजवणारी अशी आहे ती म्हणजे



"साथी" होय. शेतीची कामे सुरू करण्यापूर्वी गावच्या साडे सोळाशे एकर मध्ये गावातली जेवढी ग्रामदैवते आहेत छोटी ,मोठी या सर्व देवतांना मान देण्याचा कार्यक्रम म्हणजेच "राखणदाराला मान" देण्याचा कार्यक्रम म्हणजेच हि "साथी" होय. ही परंपरा शतकानुशतके चालू आहे. पावसाळ्यातील मृग नक्षत्राचा पाऊस संपला की दुसरे नक्षत्र सुरू होण्याअगोदर हा सण साजरा होतो. गावची गावधनीन, गावची ग्रामदैवता गावच्या रक्षणासाठी सात घटांवर बसलेली हि मरीआई आहे. या मरीआईचा पहिला मान काढला जातो .हिच ती मान काढण्याची परंपरा फार रोम हर्षक आहे.ती अशी की, समुद्राच्या भरतीच्या काळात तिचा मान काढला जातो.यावेळी तिची परडी समुद्रात सोडली जाते. पण या अगोदर गावच्या वेशी म्हणजे शिवा बांधण्याचा कार्यक्रम केला जातो. यावेळी सुमारे १४ भजन मंडळात सात भजन मंडळींचे १४ पंच मिळून हा मानाचा कार्यक्रम मोठ्या भक्ती भावानं पार पाडतात. अगदी पूर्वजांपासून हे गावच्या चार वेशी पर्यंत निवडक पंच जाऊन चार जण शेवटच्या घरापासून काही अंतरावरती खड्डा खोदून तिथे सात धान्याचे पीठ, आईच्या मानाचा लिंबू असा हा साग्रसंगीत तिचा मान त्या वेशीवर पुरण्याचे काम म्हणजेच गावच्या शिवा बांधण्याचं काम केलं जातं. जेव्हा शिवा बांधल्या जातात त्याचे वैशिष्ट्य म्हणजे यावेळी आईच्या मंदिरात मात्र अखंड घंटानाद चालू राहतो. जोपर्यंत चार दिशांना गेलेले ते पंच गावाच्या वेशीवर सात धान्याचा पीठ टाकून येत नाही, तोपर्यंत घंटानाद तसाच घणघणत असतो.

तसं पहाता या परंपरेला शास्त्रीय कारण असे असावे कि, या गावकऱ्यांच्या दृष्टीने हि भ्रामक कल्पना वाटत असली तरी यामागे शास्त्रीय दाखला आहे. पूर्वी पटकी, हिमज्वर ,प्लेग,नारु असे यासारखे साथीचे अनेक आजार यायचे. पावसाळ्यात ते पसरायचे आणि ते पसरू नये म्हणून अशी कल्पना रुढ झाली. याकरिता अशा गावच्या वेशी बांधल्या जायच्या. रविवार किंवा मंगळवार हा वार नेमून मग आईचा मान काढण्याचा निर्णय पंच घेत असतात. गावची रक्षणकर्ती मरीआई ची खण नारळओटी, पूजेचे साहित्याने परडी भरली जाते.असा हा परडीचा मान हा पूर्वपरंपरेचा मान एका घराण्याला मिळालेला आहे तो म्हणजे हरिलाल गण्या पाटील यांचे वडील त्यांचे आजोबा, पणजोबा त्यांच्या मग त्यांच्या डोक्यावरती परडी दिली जायची गावाच्या वतीने परडी घेणाऱ्या माणसाला नवीन कपडे दिले जायचे नवीन वस्त्र परिधान करून मग डोक्यावर परडी घ्यायचे. गावातील भरतीच्या वेळेला ओहटी लागण्याच्या वेळेत साधारण चार वाजता च्या सुमारास ही परडी गावाच्या आईच्या मठात नेली जायची . तेव्हा मात्र त्या काळी गावातील मराठी शाळेतल्या मुलांची शाळा लवकर सुटायची.जेणेकरून देवीचा मान निघाल्यानंतर कुठलीही मुलं बाळ या मानाच्या मध्ये येऊ नये म्हणून .या काळातआपापले घराची दारे हि बंद असायची. गावचा मान निघाला की तो खाडीकडे महाकालईच्या उघडीकडे दूर समुद्राच्या मोठ्या लाटेत हा मान काढला जायचा. तिथे नेऊन एकदा का तो मान सोडला की तिथे पंच हे साथीचा दिवस राखणदाराला कोंबड्या, बकऱ्याचा मान देण्याचा दिवस म्हणजे रविवार नेमला जायचा. शेतावरील सोळाशे एकरातील बापूजी देव, बाप देव अशा सर्व देवतांना अर्थात गावच्या सर्व आळ्यांना सगळे देव त्या त्या आळीने वाटून दिले होते. मग त्या दिवशी बोकड घेऊन त्या त्या देवाला मान दिला जातो. घारी पापडी,मलिंद्याव बोकडाचा हा मान असतो. हा मान म्हणजे एका एका आळीत दीडशे कुटुंब अशा प्रकारच्या कुटुंबाची ही साथ असते. दीडशे मटणाचे वाटे केले जातात ते एका टोपामध्ये शिजवला जाते. आणि मग तो प्रसाद म्हणून गावातील प्रत्येक घरात प्रत्येक व्यक्तीला वाटला जातो

अशी ही साथीची परंपरा आजही मोठी जुई गावात जपली आहे रुजली आहे. अजूनही या भक्ती मालेत कोणताही बदल झालेला नाही. महत्वाचे म्हणजे मृग नक्षत्रा नंतर लावणी सुरू करण्या अगोदर किंवा आवटणी सुरू करण्या अगोदर असा हा देवीचा मान काढला जातो.जोपर्यंत हा मान निघत नाही तोपर्यंत शेतीच्या कामाला कुणी ही हात लावत नाही. आणि अनावधानाने जर कोणी सुरुवात केलीच तर त्याच्यावर कोणते तरी संकट येत असे. असा समज होता आणि आजही आहे .त्यामुळे गावचे सर्व नागरिक हि साथी मनोभावे पार पडतात. एकदा का हा" साथी" चा मानपान दिला की मग शेतीच्या कामाला आनंदाने सुरुवात होते.

# गाजरवाडी येथे गुरुपौर्णिमा महोत्सवाचे आयोजन

**श्री मारुतीरायाला नारळ वाढवून तसेच पहिली निमंत्रण पत्रिका अर्पण करून प्रसाराला प्रारंभ...**

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**

गाजरवाडी येथे पहिल्यांदाच हिंदु जनजागृती समितीच्या वतीने गुरुपौर्णिमा महोत्सव आयोजन करण्यात आलेला आहे

भारतीय संस्कृतीचे अद्वितीय वैशिष्ट्य म्हणजे गुरु शिष्य परंपरा ! गुरुपौर्णिमा म्हणजे गुरुप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस. या दिवशी गुरुतत्त्व हजार पटीने कार्यरत असते. अनादी अनंत काळापासून संपूर्ण विश्व कल्याणासाठी कार्यरत असलेल्या गुरु शिष्य परंपरेचा अमूल्य वारसा आपल्या भारतीय संस्कृतीला लाभला आहे. या गुरु शिष्य परंपरेने राष्ट्र आणि धर्म संस्थापनेसाठीचेही कार्य केले आहे. पूर्ण विश्व युद्धाच्या दिशेने जात आहे तसेच भारतातही दहशतवाद पाय पसरून भारताला युद्धाकडे ओढत आहे. राष्ट्रधर्मावर विविध माध्यमातून मोठ्या प्रमाणावर आघात




होत आहे. अशा या काळात राष्ट्र आणि धर्म यांचे रक्षण करून धर्म संस्थापना करणे आवश्यक आहे. त्यासाठी या कार्यात सहभागी होणे ही गुरुप्रती कृतज्ञता ठरेल. 10 जुलै 2025 सायंकाळी 5:30 वाजता हिंदु जनजागृती समितीच्या वतीने निफाड येथील श्रीक्षेत्र गाजरवाडी गावात गुरुपौर्णिमा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. गाजरवाडी येथील ग्रामदैवत श्री मारुती मंदिर येथे नारळ वाढवून पहिली निमंत्रण पत्रिका अर्पण करून गुरुपौर्णिमेच्या प्रसाराला सुरुवात झाली. या कार्यक्रमाला सर्व ग्रामस्थांनी उपस्थित राहावे असे आवाहन हिंदू जनजागृती समितीच्या वतीने करण्यात आले.

## तुळजापूर युवा सेना उपतालुकाप्रमुख यांच्या वतीने श्री.बिरदेव ढोणे यांचे भव्य सत्कार..

**दैनिक युवक आधार -**
**-संतोष पुदाले**
**तुळजापूर धाराशिव**

तुळजापूर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे युवा सेना उपतालुकाप्रमुख सुनील कदम व तसेच युवा नेते रत्न धर्मसाले यांच्या वतीने भारतीय पोलीस सेवेतील भरती झालेले श्री. बिरुदेव ढोणे यांचे शाल पुष्पगुच्छ देऊन भव्य नागरी सत्कार करण्यात आले यावेळी सागर धर्मसाले स्वामीनाथ गुड्डे मल्लिनाथ गुड्डे दौलत गुड्डे व सर्व समाज बांधव उपस्थित होते



# लायन्स क्लब ऑफ पनवेलच्या वतीने संजय गांधी स्मारक हायस्कूल पडघे पालेबुद्रुक येथे लायन्स क्वेस्ट टीचर ट्रेनिंग वर्कशॉप यशस्वीरीत्या संपन्न

दैनिक युवक आधार
पनवेल / वार्ताहर

लायन्स क्लब ऑफ पनवेल तर्फे लायन क्वेस्ट उमलतं वय आणि किशोरवयीन मुलांसाठी सकारात्मक कौशल्ये चारित्र्यसंवर्धासाठी आणि जबाबदार नागरिकत्वासाठी कौशल्यांचा विकास बदल आणि आव्हाने याबद्दल दोन दिवसाचा टीचर ट्रेनिंग वर्कशॉप गुरुवार दिनांक 19 जून व शुक्रवार दिनांक 20 जून 2025 या दिवशी संजय गांधी स्मारक हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय पाले बुद्रुक, कोळवाडी, पडघे, पनवेल येथे यशस्वीरीत्या संपन्न झाला. या कार्यक्रमाचे उदघाटन संजय गांधी स्मारक हायस्कूल पडघे पालेबुद्रुकचे अध्यक्ष मा. काशिनाथ पाटील व चेअरमन मा. भाऊशेठ भोईर यांच्या हस्ते करण्यात आले. लायन्स क्लब ऑफ पनवेलचे अध्यक्ष लायन एस जी चव्हाण यांनी लायन क्वेस्ट च्या वर्कशॉपच्या उद्घाटनाच्या व सांगता समारंभाच्या कार्यक्रमासाठी सर्व पाहुण्यांचे स्वागत व आभार मानले व लायन क्वेस्टचे महत्व व फायदे सांगितले. लायन केस्ट हा मुलांच्या उज्वल भवितव्यासाठी एक व्यापक आणि सार्वत्रिक पुराव्यांवर आधारित सामाजिक आणि भावनिक असा शिक्षण कार्यक्रम आहे. लायन क्वेस्ट इंडिया फाउंडेशनच्या वतीने लायन क्वेस्ट या प्रोग्राम मधून विद्यार्थ्यानि कसे वागले













पाहिजे आणि त्यांनी कुठल्याही वाईट मार्गाला जाऊ नये यासाठी शिक्षकांनी मुलांना कसं आणि काय शिकवावं याबाबत लायन केस्टचे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षित शिक्षक माजी प्रांतपाल लायन बी एल जोशी यांनी ह्या दोन दिवसांच्या वर्कशॉप मध्ये सांगितले व त्यांना चांगले मार्गदर्शन केले. ह्या कार्यशाळेत पाच शाळेतील 22 शिक्षकांनी तसेच 5 लायन्स क्लब सभासदांनी सहभाग घेतला. हे प्रशिक्षित 22 शिक्षक 1600 विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात शिकविणार आहेत. त्यासाठी सहभाग घेतलेल्या सर्व शिक्षकांना लायन क्रेस्ट इन इंडिया फाउंडेशनच्या तर्फे त्यांना सर्टिफिकेटही देण्यात आलेले आहेत व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पुस्तकांचेही वाटप करण्यात आली आहेत. तसेच हा कार्यक्रम राबवण्यासाठी संजय गांधी स्मारक हायस्कूल पडघे पालेबुद्रुकचे अध्यक्ष मा. काशिनाथ पाटील व चेअरमन मा. भाऊशेठ भोईर, सचिव प्रकाश म्हात्रे, खजिनदार जोशी, संचालक हेमराज म्हात्रे आणि शाळेचे प्रिन्सिपल सुरेंद्र पाटील सरांनी तसेच श्री छत्रपती विद्यालय वावंजे शाळेचे चेअरमन मा. जी आर. पाटील सरांनी व आगरी शिक्षण संस्थेचे प्रिन्सिपल भगत सरांनी या उपक्रमाबद्दल गौरव उदगार काढले आणि आमच्या शाळेत विद्यार्थ्यांमध्ये हा कार्यक्रम राबवू असे आश्वासन त्यांनी सांगता समारंभामध्ये दिले. सांगता समारंभामध्ये लायन क्वेस्ट इंडिया फाउंडेशनचे ट्रस्टी लायन के जे पॉल व मल्टिपल कौन्सिल चेअरपर्सन एम डी 3231 लायन अमरचंद शर्मा, प्रथम प्रांतपाल लायन प्रवीण सरनाईक व मुख्य अतिथी प्रांतपाल लायन एन आर परमेश्वरन डी जी डिस्ट्रिक्ट 3231 A-4 यांनी हा कार्यक्रम राबवण्यासाठी लायन्स क्लब ऑफ पनवेलचे अध्यक्ष लायन एस जी चव्हाण व त्यांच्या इतर सभासदांचे कौतुक केले व मार्गदर्शन करून प्रोत्साहन केले तसेच डिस्ट्रिक्ट ए ३ चे डी एफ ए चेअरपर्सन लायन नितीन पुरकर यांचेही सहकार्य लाभले. या कार्यक्रमासाठी लायन सुयोग पेंडसे आर सी रिजन श्री, डिस्ट्रिक्ट पदाधिकारी लायन डॉ. नमिता मिश्रा, लायन अलोक मिश्रा, लायन क्वेस्टच्या डिस्ट्रिक्ट चेअरपर्सन लायन गायत्री साटम, लायन राजेश कुमार डी सी एज्युकेशन, लायन धर्मपाल चुग आर सी 2025-26, झोन चेअरपर्सन लायन तुकाराम घोडके, लायन डॉ. साहेबराव ओव्हाळ, लायन अड. मनोज म्हात्रे, लापन मिलिंद सूर्यवंशी, लायन अड. के एस पाटील, लायन गौतम म्हसके, लायन नंदकुमार धोत्रे, लायन लेडी नूतन धोत्रे, लायन हेमंत ठाकूर व लायन मंगला ठाकूर, लायन शोभा गिल्डा, लायन अलका चव्हाण इत्यादी सभासद उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिव लायन अशोक गिल्डा व आभार प्रदर्शन प्रोजेक्ट कोऑर्डिनेटर लायन अड. के एस पाटील यांनी केले.

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# प्रत्येक दिव्यांगांच्या घरी

## मधु तारा सेवा राज्यभर करी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी संतोष लांडे**

दिनांक 29 जून 2025 रोजी मधु तारा दिव्यांग सेवा सोशल फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने 100 टक्के दिव्यांग असलेल्या कल्याण पश्चिम सापडे गाव येथील रहिवासी सौ.धनश्री दीपक जगताप यांना त्यांच्या घरी जाऊन मोफत व्हीलचेअरचे सहकार्य करण्यात आले.
ही व्हीलचेअर साधू वासवानी मिशन पुणे यांचे टेक्निशियन श्री ज्ञानेश्वर पाटील व श्री राजेश उज्जैनवाल यांच्या सहकार्यातून मिळाली.
या वेळी मधु तारा प्रमुख श्री नितीनजी शिंदे यांनी पुण्याहून रेल्वे प्रवास करत कल्याण येथे येऊन मधु ताराचे मुंबई राज्याचे पदाधिकारी यांच्या सोबत जाऊन ही व्हीलचेअर धनश्री कदम यांना त्यांचे पती श्री दीपक कदम यांच्या समोर त्यांच्या घरात दिली. या प्रसंगी गरोदरपनात अपंगत्व आलेल्या धनश्री यांनी व्हीलचेअर मिळाल्यामुळे आनंद व्यक्त केला धनश्री यांना दोन्ही डोळ्यांनी फारस दिसत ही नाही आणि त्यांनी आपल बाळ ही गमावलं आहे. ही परिस्थिती ऐकून मधु तारा दिव्यांग सेवा सोशल फाऊंडेशन ने त्यांना मदतीचा हात दिला. या वेळी मधु तारा कल्याण डोंबिवली अध्यक्ष राज्याचे उपाध्यक्ष श्री राहुलजी वारे.राज्य उपाध्यक्षा एड योगिता सावंत.मुंबई उपाध्यक्ष श्री हुसैन भाई हुसेन.ठाणे जिल्हाध्यक्ष श्री उमेश प्रजापती.श्री अमित सर.श्री शेख सर हे मधु ताराच्या पवित्र कार्यास आवर्जून उपस्थित होते.

या वेळी श्री राहुलजी वारे.एड योगीताजी सावंत यांनी ही कार्य करण्याची संधी दिल्या बद्दल जगताप परिवाराचे आभात व्यक्त केले. मधु तारा ही सेवा राज्यभर करते कारण मधु ताराचे पदाधिकारी एकनिष्ठ समाजसेवक सामाजिक सेवेला महत्व देणारे आहेत आणि म्हणूनच आपल्याला आपल्या पदाधिकारी यांचा सार्थ अभिमान वाटतो असे मधु तारा प्रमुख म्हणाले.



# 'हिंदी सक्ती'च्या सरकार निर्णयाची होळी करूया,

## मराठी माणसाच्या एकजुटीची ताकद दाखवूया !

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर );**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धवजी बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र द्रोही सरकारच्या मराठी भाषेवर होणाऱ्या आक्रमणा विरोधात हिंदी सक्तीचा जो जीआर भाजप महायुती सरकार ने काढलाय त्या जीआर ची होळी पनवेल तालुक्यातील सर्वपक्षीय नेत्यांच्या वतीने श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळा समोर पनवेल येथे होळी करण्यात आली.

यावेळी महाविकास आघाडी सोबत , शेकापचे मा. आमदार बाळाराम पाटील , शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत , मनसे प्रवक्ता योगेश चिल्ले, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते कॅप्टन कलावत, शिवसेना उपजिल्हा प्रमुख भरत पाटील, शेकापनेते काशिनाथ पाटील,शिरीष घोटाळा ,शशिकांत डोंगरे, महानगर प्रमुख अवचित राऊत, यांच्या सह सर्वपक्षीय पुरूष



पदाधिकारी, महिला आघाडी पदाधिकारी, युवासेना पदाधिकारी तसेच मराठी प्रेमी नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेणी ता अर्धापूर येथील निधन वार्ता

**दैनिक युवक आधार**
**अर्धापूर प्रतिनिधी संदीप कदम**

प्रतिष्ठित नागरिक तथा माजी सरपंच कै. आनंदराव मुकुंदराव धुमाळ यांचे अल्पशा आजाराने निधन झालेले आहे त्यांचा अंत्यविधी दिनांक 30/6/2025 रोज सोमवार सकाळी 10 वाजता शेणी ता अर्धापूर जि.नांदेड येथे होणार आहे.



### भारतीय जनता पार्टी प्रणित राष्ट्रीय एकजूट कामगार संघटना प्रदेश उपाध्यक्षपदी रामचंद्र पवार यांची नियुक्ती

## कामगारांच्या न्याय हक्कासाठी सदैव कटिबद्ध.. रामभाऊ पवार

**दैनिक युवक आधार**
**खोपोली वार्ताहर**



रायगड जिल्ह्यातील डॅशिंग कामगार नेते रामचंद्र पवार यांच्या विविध उद्योग समूहातील कामगार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत. सदैव कामगारांच्या न्याय हक्कासाठी संघर्ष करणारे नेतृत्व म्हणून भारतीय जनता पार्टी प्रणित राष्ट्रीय एकजूट कामगार संघटने च्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष म्हणून नियुक्ती त्यांना देण्यात आली.कामगार नेते राष्ट्रीय अध्यक्ष माजी आमदार सुधाकर देशमुख यांच्या आदेशानुसार तसेच राष्ट्रीय उपाध्यक्ष राहुल वाळंज यांच्या मार्गदर्शनाखाली व राष्ट्रीय सरचिटणीस बलबीर नेगी यांच्या हस्तक्षराचे नियुक्ती पत्र दि.२० जून रोजी त्यांना सुपुर्द केले . सदर नियुक्ती बाबत आमदार आशिष शेलार, कार्यकारी अध्यक्ष कॅ. आर .तमिळ सेलवण, महिला अध्यक्षा आ. मनीषा चौधरी यांनी संघटनेच्या ध्येय धोरणांचा योग्य वापर करून कामगारांच्या हित घडवण्यासाठी शुभेच्छा दिल्या. या नियुक्तीने रायगड जिल्ह्यातुनच नव्हे तर राज्यभरातुंन त्यांच्यावर अभिनंदनाच्या शुभेच्छा वर्षाव त्यांच्या वर होताना दिसत आहे.

# खंडीत वीज पुरवठ्यामुळे पाण्याअभावी कोवळी पिके करपली, शेतकरी त्रस्त

**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर लातुर**

**शिरूरआनंतपाळ :** सतत खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे येरोळ व परिसरातील शेतकरी, ग्रामस्थ, व्यापारी त्रस्त झाले आहेत. गुरूवार, शुक्रवार, शनीवार व रविवारी सकाळपासून सात ते आठ वेळा वीज पुरवठा खंडित झाला. सतत खंडित होणाऱ्या वीस पुरवठ्यामुळे वेल्डिंग, बँकिंग, व शेतात उगवलेल्या कोवळ्या पिकांना पाणी देता येत नसल्याने शेतकरी त्रस्त झाली आहेत.

येरोळ व परिसरात रविवारी मुसळधार मृग नक्षत्रात पडलेल्या पाऊसामूळे उपलब्ध ओलीवर शेतकऱ्यांनी पेरणी केली होती. परंतु पाऊसच गायब झाल्यामुळे जमीनीतुन उगवणारे कोवळे पीक करपुन जात आहे. ज्या शेतकऱ्याकडे पाण्याची सोय आहे ते शेतकरी स्प्रिंक्लर द्वारे पाणी देण्याचा पर्यत्न करत आहेत मात्र विज लाईन दुरुस्तीच्या नावाखाली तासनतास विद्युत पुरवठा खंडीत केला जात आहे. या खंडीत वीज पुरवठ्यामुळे येरोळ येथील भा.स्टे.बॅक जि.म.बॅक, महा ई सेवा केंद्रात विविध कागदपत्र काढण्यासाठी आलेले विद्यार्थी व पैशे काढण्यासाठी ऑनलाईन होणारा व्यवहार ठप्प झाला आहे.

येरोळ येथील विद्युत केंद्रातुन दहा गावाला विद्युत पुरवठा केला जातो. परंतु लाईट




दुरुस्तीच्या नावाखाली सतत होणारा खंडीत वीज पुरवठ्यामूळे शेतकरी त्रस्त झाले आहेत. साकोळ येथील कनिष्ट अभियंत्याशी फोनवर संपर्क साधला असता त्यांचा फोन बंद रहात असल्याची तक्रार भीम शक्ती संघठणेचे ता.अध्यक्ष प्रकाश बनसोडे यांनी केली आहे.

### पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी रिक्षा चालकांना पावसाळी पडद्यांचे वाट

## दिलीप किसनराव आमले यांचे जनसेवेचे अभिनव पाऊल

**दैनिक युवक आधार**
**नेरुळ प्रतिनिधी**

पंढरपूरला वारीसाठी निघालेल्या संत भक्त वारकऱ्यांसाठी रस्त्यावर सहकार्य करणाऱ्या रिक्षाचालक भाविकांना पावसाळी संरक्षणासाठी मोफत रिक्षा पडद्यांचे वितरण करण्यात आले. हा उपक्रम शिव वाहतूक सेना नवी मुंबईचे जिल्हाध्यक्ष दिलीप किसनराव आमले यांच्या पुढाकाराने राबविण्यात आला. "जनसेवा हीच ईश्वरसेवा" या भावनेतून, रिक्षाचालकांनी वारकऱ्यांना मोफत रिक्षा सुविधा दिल्याबद्दल त्यांचा सन्मान व पावसात त्यांच्या सेवेचे रक्षण व्हावे, यासाठी या पडद्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमात सौ. संगीताताई दिलीप आमले (उपजिल्हाप्रमुख, शिवसेना नवी मुंबई), अंकिता दिलीप आमले (संचालिका, अंकिता मोटार ट्रेनिंग स्कूल), सौ. संगीता दाते, पवन आमले प्रतीक्षा दाते हे सहभागी होते







# सापळी ते सोंडा रोडवर खड्डे च खड्डे सर्व सामान्यांना जीव मुठीत धरून करावा लागतो प्रवास.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**



वाशिम तालुक्यातील सापळी ते सोंडा रोडवर खड्डे च खड्डे व ग्रामीण भागातील रस्त्यांची दयनीय अवस्था झाली आहे.रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने मार्ग क्रमन करताना पावसाळ्याच्या दिवसात अपघाताच्या घटना घडत आहेत.त्यामुळे लोक प्रतिनिधींनी व प्रशासनाने अनसिंग शहराला जोडणाऱ्या सापळी ते सोंडा रस्त्याकडे लक्ष देऊन रस्त्याची डागडुजी करावी व रस्त्यावरील खड्डे तातडीने भरावी. अशी मागणी सर्व सामान्यांची व शाळकरी विद्यार्थ्यांकडून होत आहे.सापळी सोंडा दोन्ही गावातील सर्व सामान्य नागरिक तसेच दोन्ही गावातील शाळेतील विद्यार्थी व्यापारी सेत मजूर नोकरदार वर्ग अनसिंग या ठिकाणी दैनदीन कामासाठी येतात जातात.वाशिम तालुक्यातील सर्वात मोठी बाजारपेठ असलेले अनसिंग शहर येथे प्रत्येकाला जावं लागते. वाशिल तालुक्यातील अनेक गावातील रस्त्याची दुरवस्था असल्याने सर्व सामान्यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो.या रोजच्या त्रासामुळेव असुरक्षित प्रवासामुळे प्रवासी विद्यार्थी त्रस्त झाले आहेत. एकीकडे केंद्र व राज्य सरकार हाइवे निर्माण करण्याकडे लक्ष करीत आहे.परंतु ग्रामीण भागातील रस्ते करण्यासाठी दुर्लक्ष करीत असून रस्त्याच्या दुरुस्ती कडेही दुर्लक्ष करीत आहेत. त्यामुळे अनसिंग शहराला जोडणाऱ्या या गावाच्या रस्त्याची परिस्थिती विधारक झाली आहे. याकडे संबंधित प्रशासनाने लक्ष द्यावे. अशी मागणी नागरिकांकडून तसेच विद्यार्थ्यांकडून होत आहे.

# युवा ग्रामीण पत्रकार संघटना पुणे जिल्हा कमेटी सदस्य पदी श्री. अमोल सोमवंशी यांची नियुक्ती.

दैनिक युवक आधार
किशोर रमाकांत गुडेकर,
मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख



**देहूगाव** : ग्रामीण पत्रकारितेत आणि सामाजिक कार्यात सक्रीय भूमिका बजावणारे आणि सातत्याने सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणारे श्री. अमोल सोमवंशी यांची "राष्ट्रीय युवा ग्रामीण पत्रकार संघ" पुणे जिल्हा कमेटी सदस्य पदी निवड करण्यात आली आहे. ही निवड संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. गणेश कचकलवार यांच्या मार्गदर्शनाखाली, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष मा. गणेश महाडिक यांच्या उपस्थितीत आणि मा. कांताभाऊ राठोड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी संतोष लांडे (विभागीय अध्यक्ष),श्री.गोपाळ भालेराव पुणे जिल्हा उपाध्यक्ष ग्रामीण सतीश कुमार कोकरे (हवेली तालुका अध्यक्ष), अमित मोरे (हवेली तालुका उपाध्यक्ष), संतोष सातकर, पुणे जिल्हा उपाध्यक्ष आदी मान्यवर उपस्थित होते. नवीन नियुक्तीच्या निमित्ताने श्री. अमोल सोमवंशी यांना परिसरातील पत्रकार तसेच सामाजिक कार्यकर्त्यांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पुढील काळात ग्रामीण भागातील पत्रकार बांधवांचे प्रश्न सोडवण्यासाठी आणि त्यांच्या हितासाठी सक्रीय काम करण्याचा निर्धार श्री. अमोल सोमवंशी यांनी यावेळी व्यक्त केला.आणि वरील सर्व पदाधिकारी यांचे आभार मानले.

# रत्नागिरीचे भूषण ठरणारा भव्य बौद्धविहार उभारणार : पालकमंत्री डॉ. उदय सामंत

## राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या जागेत उभारणी; व्यवस्थापन समिती स्थापन करण्याची घोषणा

**दैनिक युवक आधार**
**रत्नागिरी, (जिमाका):**

"सर्वांना अभिमान वाटेल आणि रत्नागिरीचे भूषण ठरेल असा देशातील उत्कृष्ट बौद्धविहार राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या जागेत उभारण्यात येणार आहे," अशी घोषणा पालकमंत्री डॉ. उदय सामंत यांनी केली आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाबाबत काल जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात झालेल्या आढावा बैठकीत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या. या बैठकीला अपर जिल्हाधिकारी भाऊसाहेब गलांडे, निवासी उपजिल्हाधिकारी चंद्रकांत



सूर्यवंशी, उत्पादन शुल्क अधिक्षक कीर्ती शेडगे, मुख्याधिकारी वैभव गारवे यांच्यासह विविध संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. डॉ. सामंत म्हणाले, "राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या जागेवर उभारण्यात येणारा हा बौद्धविहार केवळ धार्मिक स्थळ न राहता रत्नागिरीचा गौरव ठरेल असा सांस्कृतिक, अध्यात्मिक आणि पर्यटनदृष्ट्या समृद्ध केंद्र ठरेल. यासाठी सर्व संबंधित विभागांचा समन्वय साधून, स्थानिक नागरिकांनाही विश्वासात घेत एक व्यवस्थापन समिती स्थापन केली जाईल. याबाबतची कार्यवाही चिपळूण नगर परिषदेकडून केली जाईल. "विहाराच्या संकल्पनेपासून प्रत्यक्ष उभारणीपर्यंतचा आराखडा, निधी व्यवस्थापन, प्रशासनिक मंजुरी आणि स्थापत्यदृष्ट्या दर्जा या सर्व बाबींचा विचार करून पुढील टप्पे राबवले जातील, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. या उपक्रमामुळे रत्नागिरी जिल्ह्यातील बौद्ध समाजाला एक भक्कम सांस्कृतिक आधार मिळणार असून, पर्यटकांसाठीही एक महत्त्वाचे आकर्षणकेंद्र निर्माण होणार आहे. स्थानिकांच्या रोजगाराच्या संधींसोबतच जिल्ह्याचा सांस्कृतिक वैभवही अधिक उजळणार असल्याचे उपस्थितांनी नमूद केले.

# करंजा रेवस-रेड्डी महामार्ग काम बंद

## या मतावर जनता ठाम : सरपंच अजय म्हात्रे

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

रेवस–रेड्डीहा शासनाचा महत्वाचा प्रकल्पअसून गेली अनेक महिने उरण करंजा रेवस महामार्गावर सुरु असलेल्या कामकाजा मुळे करंजा गावांतील सात पाडे व ग्रामपंचायत हद्दीतील बाधित शेतकरी व मच्छीमार यांची करंजा रेवस रेड्डी महामार्गावरील पुलाचे सुरू केलेले काम ग्रामस्थ व महिलां यांनी आपल्या मागण्यापूर्ण होण्याच्या दृष्टीकोनांतून या सुरु झालेल्या कामास विरोध दर्शवून बंद पाडले आहे. ते काम सुरू होण्याचे दृष्टिकोनातून सकारात्मक निर्णय घेण्याच्या दृष्टीने उरणचे तहसीलदार,उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस



निरीक्षक व एम.एस.आर.डी. एस चे मुख्य अभियंता यांचे उपस्थितीत त्यांचे आग्रहास्तव चाणजे ग्रामपंचायतीचे सरपंच अजय म्हात्रे यांनी 28 जून 2025रोजी ग्रामपंचायत कार्यालय सभागृह चाणजे येथे सभा बोलावली होती. सदर सभेसाठी उपसरपंच श्रीमती कल्पना पाटील, माजी सभापती ॲड.सागर कडू, माजी जिल्हा परिषद सदस्य सिताराम नाखवा,ॲड.वेदांत नाखवा. आजी माजी ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष व ग्रामस्थ व महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. रेवस–रेड्डीहा शासनाचा महत्वाचा प्रकल्पअसून शासनाच्या बहुउद्देशीय प्रकल्पास ग्रामपंचायने विशेष ग्रामसभा घेऊन प्रकल्पास विरोध दर्शवून ठेकेदार कंपनीच्या दडपशाहीलाबळी न पडण्याचे सूचित करण्यात आले आहे. अशा प्रकारे ठराव घेऊन विरोध प्रकल्पाला विरोध करणे हे शासनाच्या धोरणाविरुद्ध आहे. सदरच्या प्रकल्पामुळे बधीत होत असलेल्या मच्छीमारांना शासकीय धोरण नुसारनुकसान भरपाई देण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत या बाबत सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय विभाग अलिबाग यांना कळविण्यात आले आहे.तसेच याकामी संपादित होत असलेल्या खाजगीजमिनीस शासनाच्या प्रचलित धोरणानुसार मोबदला निश्चित करण्याची कारवाई सुरु आहे त्यामुळे या प्रकल्पास कुणी विरोध करू नये असे आव्हान शासकीय अधिकाऱ्याकडुन करण्यात आले आहे. मात्र सरपंचासह सर्व उपस्थित प्रकल्पबाधित नागरिकांनी, "अगोदर नुकसान भरपाई नंतरच काम सुरू" यामतावर ठाम राहिल्याने या सभेत कोणताही सकारात्मक निर्णय होऊ शकला नाही. त्यामुळे तहसीलदार, वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी मिटींग आटोपती घेतली.शेवटी सरपंचानी उपस्थित प्रकल्पग्रस्थाना आवाहन केले की आपली अशीच एकजूट कायम ठेऊन अन्याया विरोधातला हा लढा अधिक तिव्र करुन आपल्या न्याय्य हक्कांसाठी लढत राहू. असा निर्णय प्रकल्पबधीतानी दिनांक 28 जून 2025 रोजी चाणजे ग्राम पंचायत कार्यालयात आयोजित सभेत घेतला आहे.

# वाशिम जिल्हा खाजगी शाळा शिक्षकेतर संघटनेची जिल्हा कार्यकारणी गठीत

**दैनिक युवक आधार**
**रिसोड प्रतिनिधी.**
**रणजीत सिंह ठाकुर**

वाशिम जिल्हा शिक्षकेतर संघटनेची नव्याने जिल्हा कार्यकारणी गठीत करण्यात आली असून त्यामध्ये संघटनेचे जिल्हाध्यक्ष अविनाश पसारकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते प्रमुख उपस्थितीमध्ये जिल्हा सचिव रामराव कायंदे कार्याध्यक्ष कैलास ढवळे उपाध्यक्ष विष्णुपंत बाजड तसेच जिल्ह्यातील सर्व तालुक्याचे जिल्हा अध्यक्ष व सचिव यांची उपस्थिती लाभली.



सर्वप्रथम मान्यवराच्या हस्ते सरस्वतीचे पूजन करण्यात आले कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा सचिव रामराव कायंदे यांनी केले व नवीन जिल्हा कार्यकारिणीची पुढील प्रमाणे निवड करण्यात आली. नवनियुक्त जिल्हाध्यक्ष म्हणून सर्वानुमते कैलास ढवळे यांची निवड करण्यात आली तर रामराव कायंदे यांची जिल्हा सचिव म्हणून निवड करण्यात आली. तर कार्याध्यक्षपदी प्रफुल्ल काळे जिल्हा उपाध्यक्ष आनंद पेंटे जयंत सरनाईक महादेव धुळधुळे सहसचिव निलेश मस्के कोषाध्यक्ष अमोल मोहळे तर जिल्हा संघटक पदावर गजानन इंगोले,कैलास बोरचाटे,संजय लहाने,मनोज चाकोलकर,दत्तात्रय गारुळे,सौ स्मिता इंझाळकर तर प्रसिद्धी प्रमुखपदी ओंकार गिरी यांची निवड झाली.
वरील नवनियुक्त सर्व जिल्हा पदाधिकाऱ्यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाला जिल्हाभरातून जवळपास २०० शिक्षकेतरांची उपस्थिती होती होती कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेश पडघान यांनी केले तर आनंद पेंटे यांनी आभार मानले

# लायन्स क्लब पोयनाडच्या अध्यक्षपदी गुरुनाथ माळी

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

अलिबाग, प्रतिनिधी– ग्रामीण भागात असूनही लायन्स क्लब पोयनाडच्या सेवाकार्याची भरारी ही नेत्रदीपक आहे. नेत्रचिकित्सा आणि आरोग्य चिकित्सा आणि इतर सामाजिक कार्यामुळे लायन्स क्लब पोयनाडचा आधार गरजू, गरीब, तसेच तळागळीतील, आदिवासी बंधू भगिनींना मिळत आहे ही अभिमानाची आणि कौतुकाची बाब आहे. आता हेच सेवाकार्य लायन्स क्लब पोयनाडचे नवीन अध्यक्ष गुरुनाथ माळी चांगल्याप्रकारे पार पाडतील असा विश्वास डिस्ट्रीक्ट ३२३१ ए२ चे पीएमजेएफ पीडीजी मानेश्वर नायक यांनी व्यक्त केला. लायन्स क्लब पोयनाडचा सन २०२५–२६ वर्षासाठीचा इन्स्टॉलेशन आणि इंडक्शन समारंभ शुक्रवार, २७ जून २०२५ रोजी सायंकाळी ६.३० वाजता पाटील ब्रदर्स, पांडवादेवी, पोयनाड



येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या समारंभात गुरुनाथ माळी यांनी अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली. यावेळी प्रमुख पाहुणे डिस्ट्रीक्ट ३२३१ ए २ चे पीएमजेएफ पीडीजी मानेश्वर नायक यांनी इन्स्टॉलेशन अधिकारी म्हणून मार्गदर्शन केले, तर डिस्ट्रीक्ट ३२३१ ए ४ चे पहिले व्हाईस डिस्ट्रीक्ट गव्हर्नर पीएमजेएफ प्रवीण सरनाईक यांनी इंडक्शन अधिकारी म्हणून जबाबदारी सांभाळली. कार्यक्रमाला डिस्ट्रीक्ट ३२३१ ए २ चे पीएमजेएफ पीडीजी मुकेश तनेजा आणि झोन चेअरपर्सन विकास पाटील यांसारखे अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी डीजी मानेश्वर नायक बोलत होते. प्रारंभी प्रवीण सरनाईक यांनी इटरनॅशनल लायन्स क्लबची माहिती देऊन पोयनाड लायन्स क्लबच्या कार्याचे कौतुक केले. मुकेश तनेजा यांनीही ही कार्याची अशीच घोडदौड चालू ठेवावी, अशा शुभेच्छा दिल्या. तर विकास पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय कार्यकाळातील कामाचा लेखाजोखा मांडला, तर हेच काम मी संपूर्ण सामर्थ्यानिशी पुढे नेणार असल्याचे नवीन अध्यक्ष गुरुनाथ माळी यांनी सांगितले. या समारंभात नूतन संचालक मंडळाची घोषणा करण्यात आली आणि त्यांना पदाची शपथ देण्यात आली. यामध्ये गुरुनाथ माळी यांनी अध्यक्ष, विनोद पाटील यांनी पहिले उपाध्यक्ष, प्रगती सिनकर यांनी सचिव, रत्नाकर सूर्यवंशी यांनी सहसचिव, नीलम माळी यांनी खजिनदार आणि सुधीर पाटील यांनी सह–खजिनदारपदाची जबाबदारी स्वीकारली. याव्यतिरिक्त लायन प्रदीप सिनकर (सदस्यत्व चेअरपर्सन), दिलीप गाटे (एलसीआयएफ को–ऑर्डिनेटर), विकास पाटील (सेवा चेअरपर्सन), अरविंद अग्रवाल (क्लब अडमिनिस्ट्रेटर), सुनील काकडे (टेमर), महेंद्र पाटील (टेल ट्विस्टर) आणि मनोहर चवरकर (मार्केटिंग आणि कम्युनिकेशन चेअरपर्सन) यांचाही समावेश आहे. प्रमोद पाटील, सतीश पाटील, मनीष अग्रवाल, प्रमोद राऊत, प्रमोद पाटील, ममता अग्रवाल, कौस्तुभ जोशी, मनोज एस. जैन आदींनी संचालक म्हणून जबाबदारी स्वीकारली. या कार्यक्रमातील प्रमुख उपस्थितांमध्ये लायन्स हेल्थ फाऊंडेशनचे उपाध्यक्ष नितीन अधिकारी, सुबोध राऊत, मोहन पाटील, प्रदीप पाटील, धवल राऊत, अजय अंगणे, बाळकृष्ण कोळी, सागर पाटील, विजय वनगे, डिस्ट्रिक्ट कोऑर्डिनेटर अनिल म्हात्रे, नयन कवळे, नितीन शेडगे, महेंद्र पाटील, महेश कवळे, अड. डॉ. के.डी. पाटील, डॉ. श्रीकांत पाटील, विद्या अधिकारी यांच्यासह मांडवा, अलिबाग, नागाव आणि पोयनाड लायन्स क्लबचे पदाधिकारी, सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रगती सिनकर आणि प्रियांका राऊत यांनी केले.

## श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहायता संस्था व शिवराज युवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने जीवनावश्यक वस्तू वाटप व मोफत आरोग्य चिकित्सा.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**

कोणत्याही सामाजिक संस्था म्हणजे समाजाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी सामाजिक जीवन व्यवस्थित चालवण्यासाठी या संस्था कार्यरत असतात. या संस्था समाजाच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी नेहमीच कार्यरत असतात. गरीब, गरजू ,दुर्बल घटकांना या आपल्या सामाजिक उपक्रमातून या संस्था आधार देत असतात. त्यांच्या शैक्षणिक, सांस्कृतिक, आरोग्याच्या बाबतीत या संस्था सामाजिक बांधिलकीची जाणीवेतून आपले योगदान देत असतात. अशीच एक उरण तालुक्यातील सामाजिक संस्था श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहायता संस्था व शिवराज प्रतिष्ठान उरण यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २८ जून २०२५ रोजी पिरवाडी आदिवासी वाडी येथे जाऊन जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी पिरवाडी आदिवासी वाडी येथील आदिवासी बांधव भगिनी व लहान मुले बहुसंख्येने उपस्थित होते. आदिवासी बांधवांनी आलेल्या मान्यवरांचे स्वागत केल्यानंतर प्रथम येथील महिलांची व लहान मुलांची आरोग्य तपासणी झाली. डॉ दया परदेशी यांच्या मार्फत जवळपास ४० रुग्णांची आरोग्य तपासणी झाली व त्यांना मोफत औषधे देण्यात आली. त्यानंतर प्रत्येक कुटुंबासाठी जीवनावश्यक वस्तूंचे किट देण्यात आले. जवळजवळ ४५ जीवनावश्यक किट्स यावेळी देण्यात आले. या उपक्रमासाठी शिवराज युवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष संदेश भाई ठाकूर, श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहायता संस्थेच्या कार्याध्यक्षा रायगड भुषण संगीता ताई ढेरे, कविता म्हात्रे ,पूजा प्रसादे, मीना रावल, विशाखा म्हात्रे, अनघा ठाकूर, रश्मी तांबे ,सीमा निकम, सुमन ताई तोगरे, श्रेया ठाकूर, तृप्ती भोईर ,योगेश म्हात्रे ,उमेश वैवडे, सचिन ढेरे, केशव निकम, दिनेश हळदणकर, अमर ठाकूर ,आनंद ठक्कर, श्याम भोईर, सुभाष पाटील ,संग्राम काका तोगरे, दीपक प्रसादे या सर्वांचे विशेष सहकार्य लाभले. त्याचप्रमाणे पिरवाडी आदिवासी वाडी येथील बांधवांचे ही उपक्रम यशस्वी होण्यासाठी मोलाचे सहकार्य लाभले.




## श्री एकवीरा देवस्थान द्वारे तोकडे कपडे ,अंग प्रदर्शन ,मिनि स्कर्ट, हाफ पॅन्ट वर निर्बंध.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याची कुलस्वामिनी तसेच आगरी, कोळी ,कराडी समाजातील लोकांचे आराध्य दैवत, जागृत देवस्थान असलेल्या जगभरातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेली कार्ला गडावरील श्री एकविरा आई देवीच्या सर्व भाविकांच्या सहकार्याने तसेच महाराष्ट्र शासनाच्या मार्फत एकविरा आई गडावर गड परिसरात अधिक विकास कामे चालू आहेत, ही एकविरा आईच्या आशीर्वादाने गडावर गड परिसरात पावित्र्य व मांगल राखून भाविकांना सहजतेने ,सुलभतेने एकविरा आईचे दर्शन व्हावे हा एकविरा आई देवस्थान ट्रस्टच्या विश्वस्त मंडळाचा मनोदय आहे.



श्री एकविरा देवीच्या आशीर्वादाने कार्ला गडावर पावित्र्य व मांगल्य राखण्यासाठी श्री एकविरा देवी ट्रस्टच्या सर्व विश्वस्त मंडळांनी एक नवीन ड्रेस कोड नियम अमंलात आणला आहे. कृपया सर्व भाविकांनी श्री एकवीरा देवी कार्ला गडावर दर्शनास येताना या नियमांचे पालन करावे.

दिनांक २७ जून २०२५ पासून लागू करण्याचा ठराव एकविरा आई देवी ट्रस्ट विश्वस्त मंडळ यांच्याकडून करण्यात आला आहे .७ जुलै २०२५ पासून ड्रेस कोड लागू करण्यात आले आहेत. तोकडे कपडे, अंग प्रदर्शन, मिनि स्कर्ट असे चालणार नाही .याची भाविकांनी नोंद घ्यावी.

## पावसाची उघडीप, कोवळ्या पिकांना स्प्रिक्लरद्वारे पाणी

**दैनिक युवक आधार**
**प्रविण तांबोळकर लातुर**
**शिरुरआनंतपाळ**

शिरूरआनंतपाळ तालुक्यासह येरोळ व परिसरात पेरणी केल्यापासुन गेल्या दहा बारा दिवसापासुन पावसाने उघडीप दिली आहे. त्यामुळे कोरडवाहु क्षेत्रातील शेतकऱ्याच्या नजरा आभाळाकडे लागुन राहील्या आहेत. तर ज्यांच्याकडे पाण्याची उपलब्धता आहे असे शेतकरी कोवळ्या पिकांना स्प्रिंक्लर व रेन पाईपद्वारे पिकाला पाणी देणे सुरु केले आहे. तर काही ठिकाणी जमीनीत ओल नसल्याने पेरलेले बियाणे जमीनीतच नासल्याने दुबार पेरणी करावी लागली आहे.

येरोळ व परिसरातील सुमठाणा,चामरगा, धामणगाव, बोळेगाव, कारेवाडी, पांढरवाडी, नागेवाडी, तळेगाव, आजणी, हानमंतवाडी, जांभळवाडी आदी गावामध्ये दहा जुन च्या जवळपास पेरण्या केल्या होत्या. चांगल्या जमीनीमधील पिक कसे तरी तग धरत आहेत मात्र हलक्या रानावरील कोवळी पिके माना टाकुन देत आहेत. आणखीन चार पाच दिवसात



पाऊस नाही पडल्यास उगवलेली कोवळी पिकेही करपुन जाण्याची शक्यता आहे. ज्यांच्याकडे पाण्याची सोय आहे असे शेतकरी स्प्रिंक्लर व रेन पाईपद्वारे पाणी देऊन पिक जगविण्याचा केवळवानी पर्यत्न करत आहेत. त्यातच लाईट दुरुस्तीच्या नावाखाली दिवसातुन चार चार तास लाईट कपात करत असल्याने शेतकऱ्याची डोके दूखी वाढली आहे याकडे संबधीत विभागाने लक्ष देऊन लाइट सुरळीत सोडावी अशी मागणी भीम शक्ती संघटणेचे शि.आनंतपाळ तालुका अध्यक्ष प्रकाश बनसोडे यांनी केली आहे.

## महाराष्ट्र शासनाच्या मूल्यवर्धन उपक्रमात तालुका समन्वयक पदी विजय खुडे यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**



शांतीलाल मुथा फाउंडेशन (SMF) महाराष्ट्र शासन यांच्या सहकार्याने त्यांच्या प्रमुख कार्यक्रम म्हणून मूल्यवर्धन हा उपक्रम संपूर्ण महाराष्ट्रभर राबवीला जाणार आहे जे तालुका पातळीवर कार्यक्रमाचे नेतृत्व करू शकतील अशा उत्कृष्ट समन्वयक कौशल्य असणाऱ्या आणि शासकीय यंत्रनेसोबत कामाचा अनुभव असणाऱ्या उमेदवारांना प्रधान्यांने यामध्ये संधी मिळते यामध्ये तालुका स्तरावर प्रशिक्षण आयोजित करणे शालेय शिक्षकांची 100 उपस्थितीती आणि सक्रिय सहभाग करून घेणे मूल्यवर्धन अंमलबजावणी संदर्भात पाठपुरवठा घेण्यासाठी नियमित शाळा भेटी देणे शिक्षकांचे वर्ग निरीक्षण करणे त्यांना रचनात्मक अभिप्राय देणे असे विविध कामे यामध्ये करावी लागतात यासाठी वीजय खुडे यांची निवड झाली त्यासाठी सर्वत्र त्यांचे कौतुक केले जात आहे.

# पनवेलमध्ये युवा जिल्हास्तरीय तायक्वांडो चॅम्पियनशिप स्पर्धेचे भव्य आयोजन

### जागृती फाउंडेशन व तायक्वांडो असोसिएशन ऑफ पनवेल शहर यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम उत्साहात पार पडला

**दैनिक युवक आधार**
**सहसंपादक मुकुंद कांबळे**

**पनवेल** : पनवेल शहरात खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी आणि तायक्वांडो सारख्या लोकप्रिय खेळाची गती वाढवण्यासाठी जागृती फाउंडेशन व तायक्वांडो असोसिएशन ऑफ पनवेल शहर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली पनवेल युवा जिल्हास्तरीय तायक्वांडो चॅम्पियनशिप स्पर्धा मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडली. या भव्य स्पर्धेचे व पूजन सोहळा सुप्रसिद्ध समाजसेवक व जागृती फाउंडेशनचे अध्यक्ष, तसेच पनवेल तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष मा. निलेश सोनावणे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.




या कार्यक्रम उद्घाटन सोहळ्यास रायगडचे लोकनेते माननीय रामशेठ ठाकूर कसे प्रीतम दादा म्हात्रे गणेश कडू सुनील बहिरा व इतर मान्यवर कसे पत्रकार उपस्थित होते.त्यांनी देवीचे पूजन करून आणि नारळ फोडून या स्पर्धेचा विधिवत शुभारंभ केला. या प्रसंगी तायक्वांडो असोसिएशन ऑफ पनवेल शहरच्या अध्यक्षा मा. ॲड. प्रज्ञा भगत, सचिव मा. रंजन भोईर, उपाध्यक्ष मा. हेमंत कोळी, कार्याध्यक्ष मा. रवींद्र भगत, वीर तायक्वांडो अकॅडमी पनवेलचे अध्यक्ष मा. हरेश्वर भगत यांच्यासह शहरातील अनेक मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, खेळाडू, प्रशिक्षक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमानिमित्त आयोजित सत्कार समारंभात पनवेल शहर व परिसरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी आयोजकांच्या अभिनंदनासह खेळाडूंना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तायक्वांडो खेळ हा केवळ खेळ नसून तो शिस्त, आत्मरक्षण आणि आत्मविश्वास याचे मूळ आहे. अशा स्पर्धांमुळे युवकांचे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक विकास होते. तसेच पनवेल शहरातील तरुण पिढीला खेळासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होत आहे, असे गौरवोद्गार यावेळी मा. निलेश सोनावणे यांनी काढले. कार्यक्रमाचे उत्तम नियोजन, शिस्तबद्ध आयोजन आणि खेळाडूंना दिलेले प्रोत्साहन यामुळे संपूर्ण पनवेलमध्ये या स्पर्धेची मोठी चर्चा झाली आहे. खेळाडूंमध्येही या स्पर्धेविषयी विशेष उत्साह दिसून आला. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल तायक्वांडो असोसिएशन आणि जागृती फाउंडेशनचे सर्व पदाधिकारी, स्वयंसेवक आणि कार्यकर्त्यांचे उपस्थित मान्यवरांनी विशेष कौतुक केले.

## सॉफ्टवेअरचा गैर वापर करणारा हॅकर गजाआड, कल्याण ग्रामीण पोलीसांची कौतुकास्पद कामगिरी..!

**दैनिक युवक आधार**
**कल्याण प्रतिनिधी**
**-गुरुनाथ तिरपणकर**

सध्या सायबर गुन्ह्यांमध्ये बऱ्याच प्रमाणात झालेली आहे, त्या अनुषंगाने नुकताच टीटवाळा येथे मा.पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण, ठाणे यांच्या आदेशानुसार कल्याण तालुका पोलीस स्टेशन यांच्या मदतीने टिटवाळा मांडा परिसरात राजेश ग्राफिक या दुकानात इण्डियन कॉपीराईट प्रोटेक्शन(अंटी पायरसी सेल) मुंबई चे मुख्य तपासी अधिकारी रामजित(जीतु) गुप्ता यांनी छापा टाकून एका इसमाच्या विरोधात कॉपीराइट अंतर्गत पायरेटेट सॉफ्टवेअर वापरत असल्याने कॉपीराइट ऍक्ट नुसार गुन्हा दाखल केला असून पुढील तपास कल्याण तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी करत आहेत.सदर कार्यवाही कल्याण तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक चोरगे सर, इण्डियन कॉपीराईट प्रोटेक्शन चे मुख्य तपासी अधिकारी रामजित(जितु) गुप्ता,रवि वासवानी गीतांजली शिर्के मॅडम, व दिपाली पाटील यांनी केली.



## आदई ग्रामपंचायत हद्दीतील नागरी आरोग्य केंद्र सुरू करण्याची मनसेची मागणी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

आदई ग्रामपंचायत हद्दीतील नागरी आरोग्य केंद्र सुरू करण्याची मागणी मनसेचे पनवेल तालुका उपाध्यक्ष सुजित पावलस सोनवणे यांनी तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती पनवेल यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

आदई ग्रामपंचायत हद्दीतील अनेक ठिकाणी ताप, डोकेदुखी, सर्दी व खोकला या आजाराचे रुग्ण आढळून आलेले आहेत. हा आजार संसर्गजन्य असल्याने अनेक रुग्ण वाढत आहेत. जिल्हा परिषद दवाखाना लांब असल्याने या ठिकाणी रुग्णांना अडचण निर्माण होत आहे. त्यामुळे येत्या पंधरा दिवसांमध्ये आदई विभागामध्ये नागरी आरोग्य केंद्र सुरू करावे जेणेकरून अनेकांना याचा लाभ घेता येईल. यासाठीचे निवेदन मनसेचे सुजित सोनवणे यांनी तालुका आरोग्य अधिकारी यांना दिले आहे.

## घुंगराळा येथील गुणवंता विद्यार्थी व शासकीय सेवेत निवड झालेल्या कर्मचाऱ्यांचा सन्मान सोहळा आ.प्रताप पाटील चिखलीकर यांच्या हास्ते संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

**नांदेड** – राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशसरचिटणीस वसंत सुगावे पाटील यांच्या वतीने घुंगराळा येथील गुणवंत विद्यार्थी व शासकीय सेवेत निवड झालेल्या कर्मचाऱ्यांच्या सन्मान सोहळा संपन्न घुंगराळा विद्यार्थी व युवकांनी अभ्यासात सातत्य ठेवल्यास त्यांना निश्चीतपणाने यश मिळेल असे गौरवोद्गारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आ.प्रतापराव पा.चिखलीकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशसरचिटणीस वसंत सुगावे पाटील यांच्या वतीने आयोजित केलेल्या घुंगराळा येथील कार्यक्रमात बोलत होते घुंगराळा येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशसरचिटणीस वसंत सुगावे पाटील यांनी गुणवंत विद्यार्थी व शासकीय सेवेत निवड झालेल्या कर्मचाऱ्यांच्या सत्कार सोहळा कार्यक्रम आयोजित केला होता गुणवंताचा सत्कार आ.प्रतापराव पा.चिखलीकर यांच्या शुभहस्ते करण्यात आला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जि. प. माजी सभापती शिवराज पा.होटाळकर,यांची उपस्थिती या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी,राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष बालाजीराव शिंदे,बिलोली पंचायत समितीचे मा. उपसभापती अशोक पा. मुगावकर,राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रदेशसहसचिव प्रा. सुनील नानवटे,महिला व बालकल्याण समितीचे सदस्य किशोर नावंदे,कुंटूर पोलीस स्टेशन चे सहाय्यक पोलीस निरीक्षक भोसले साहेब,नायगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय मिरजकर साहेब, महावितरण चे उपअभियंता शिंदे साहेब,सचिन नाईक,राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे मा.तालुकाध्यक्ष विश्वनाथ बडूरे,परबत पा.जाधव ,घुंगराळा ग्रामपंचायत च्या सरपंच सौ.रुक्मिणीबाई पांचाळ, आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती या कार्यक्रमात 10 वी 12 वी व इतर स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या व शासकीय सेवेत निवड



झालेल्या 70 गुणवंताचा आ.चिखलीकर साहेब यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमात छावा संघटनेचे राजेश मोरे देगावकर,यांनी आ.चिखलीकर साहेब यांच्याहस्ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला यावेळी दिलीपराव धर्माधिकारी, शिवराज पा.होटाळकर,यांनी मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक वसंत सुगावे पाटील,यांनी केले सूत्रसंचालन प्रा.माधव यमलवाड,यांनी तर परबता हणमंते गुरुजी यांनी आभार मानले याकार्यक्रमास सावरखेड,रुई,निळे गव्हाण,आंतरगव,कृष्णर,वंजारवडी,यासह अनेक गावचे सरपंच चेअरमन विद्यार्थी पालक नागरीक मोठया संख्येने उपस्थित होते.

## दत्ता गड्डुलवाड उर्फ नागपुत्र यांना छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्काराने सन्मानित .

**दैनिक युवक आधार**
**किनवट प्रतिनिधी**
**विशाल भालेराव**

फुले आंबेडकरी चळवळीतील दलित पॅंथर से ज्येष्ठ कार्यकर्ते दत्ता गड्डुलवाड उर्फ( नागपुत्र) यांना अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्स कडून त्यांच्या आंबेडकरी चळवळीतील योगदानाबद्दल छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाज भूषण पुरूस्काराने सन्मानित करण्यात आला, हा पुरस्कार छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीच्या अवचित वर गुरुवारी ता .२६ रोजी सिडको नवीन नांदेड येथील रुबी हॉटेलमध्ये आयोजित कार्यक्रमात पॅंथर नेते रमेश भाऊ



खंडागळे यांच्या उपस्थितीत देण्यात आल्याची माहिती मिळाली .

दत्ता गड्डुलवाड यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा मित्र मंडळा तर्फे ईस्लापूर येथील शासकीय विश्रामगृहात शाल श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला . त्यावेळी वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते जगदीप हानवते ,निर्गुण पाटील हुडीकर हिरामण शेळके, नितीन शेळके, प्रमोद जाधव , आदी मित्र मंडळाने त्यांचे अभिनंदन केले . विशेष म्हणजे या पुरस्कारासह त्यांच्या कारकिर्दीमुळे त्यांना एकूण बारा पुरस्कार मिळाल्याची माहिती त्यांनी दिली .

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## "साळाव ते तळेखार रस्ता रखडला: सार्वजनिक बांधकाम विभागाचे डोळे झाकलेत का?"

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

साळाव ते तळेखार दरम्यान सुरू असलेले डांबरीकरणाचे काम धोकादायक आणि अपूर्ण अवस्थेत थांबले असून, पावसाळ्याच्या उंबरठ्यावर हा रस्ता अक्षरशः खड्ड्यांचे साम्राज्य बनला आहे. गाडी चालवणे म्हणजे जिवाशी खेळ करण्यासारखे झाले आहे. नागरिकांमध्ये संतापाचा भडका उडालाय.या रस्त्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे असतानाही, विभागाने ठेकेदाराच्या निष्काळजीपणाकडे दुर्लक्ष का केले? या पाठीमागे 'बंद दाराआड बंद पाकिटां'चा खेळ सुरु असल्याचा संशय आता उघडपणे व्यक्त होत आहे. "बेकायदेशीररीत्या काम सुरू करणाऱ्या ठेकेदाराला कोण पाठिंबा देतोय?" असा थेट सवाल गावकरी करत आहेत. 'N.O.C.' घेतली की नाही? अपघाताला जबाबदार कोण?



या रस्त्याचे काम सुरू करताना ठेकेदाराने कोणतीही कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली नाही, असा आरोप ग्रामस्थ करत आहेत. N.O.C., सुरक्षा सूचना, पर्यायी मार्ग याचा कोणताही मागमूस नाही. दूधवाले, भाजी विक्रेते, विद्यार्थी, रोजचे प्रवासी यांचे हाल अत्यंत कष्टदायक झाले आहेत. खड्ड्यांमध्ये गाड्या अडकत आहेत, दुचाकीस्वार घसरून पडत आहेत, आणि अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना नाही.प्रशासन गप्प, नेते तोंड बंद कोणाच्या दबावामुळे?ग्रामस्थांनी जोरदार आरोप केला की, काही स्थानिक पुढाऱ्यांनी 'बंद पाकिटां'च्या बदल्यात आपली तोंड बंद ठेवली आहेत. त्यामुळे सामान्य जनतेला दररोज जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतोय. ठेकेदाराच्या मनमानीवर कोणाचा वरदहस्त आहे, हे उघड व्हावे, अशी मागणी केली जात आहे.

"अपघात झाला तर ठेकेदार आणि प्रशासन जबाबदार ठरेल" संतप्त नागरिकांची चेतावणी

संतप्त ग्रामस्थांनी आता ठेकेदारांविरोधात तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली असून, जर अपघात घडला तर ठेकेदारासोबतच जिल्हा प्रशासन व लोकप्रतिनिधींनाही गाफील धरले जाईल, असा इशारा दिला आहे. रूटिंग पक्षातील स्थानिक नेत्यांमुळे जनतेचे हाल होत आहेत, ही जनतेची ओरड सरकार ऐकेल का?

" सरकारने त्वरित चौकशी करून या गुप्ताचाराचा आणि बांधकामातील भ्रष्टाचाराचा पर्दाफाश करावा, अन्यथा जनआक्रोश पेटून उठल्यास जबाबदार कोण?

## आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने अमरापूर ते पंढरपूर दिंडीतील वारकऱ्यांना अल्पोपहार वाटप

### ह.भ.प. काका महाराज मुखेकर,ह.भ.प. उद्धव महाराज जाधव यांचे केले स्वागत

**दैनिक युवक आधार**
**बीडआष्टी प्रतिनिधी**
**मारुती सत्रे**

आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने अमरापूर ते पंढरपूर दिंडीतील वारकऱ्यांना रविवार दि २९ जून रोजी दुपारी ४ वाजता आष्टी येथील डोईठाण रोडवरील शिंदेवाडी फाटा येथे प्रवास करणाऱ्या वारकऱ्यांसाठी चहा-बिस्किटांचे अल्पोपहार वाटप केले. ही मोहीम संघाच्या सामाजिक जबाबदारीचा भाग म्हणून आयोजित करण्यात आली होती. यावेळी भैरवनाथ पायीं दिंडी अमरापूर ते पंढरपूर दिंडीतील ह.भ.प. काका महाराज मुखेकर,ह.भ.प. उद्धव महाराज जाधव यांचे आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार समीर शेख,पत्रकार मारूती संत्रे,डिमोलेशन कॉन्ट्रॅक्टर अक्षय भोसले,गुलाब काकडे, राजेंद्र पोकळे, गणेश पोकळे,काकासाहेब पोकळे,सागर नन्नवरे,मिरा थोरात,अमृपाली चव्हाण यांनी स्वागत केले. याप्रसंगी अमरापूर येथील हभप काका महाराज मुखेकर व वारकऱ्यांनी युवा पत्रकार संघाच्या या स्तूत्य उपक्रमाचे कौतुक केले. "सेवा हाच परमेश्वराचा मार्ग"या भावनेतून आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने सामाजिक सेवेच्या अनेक कार्यक्रमांचा भाग म्हणून वारकऱ्यांना अल्पोपहार वाटप करण्यात आले तर हा उपक्रम पुढील वर्षीही अशाच प्रकारच्या सेवाभावी कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे संघाचे मनोधारण असल्याचे अध्यक्ष अविनाश कदम यांनी सांगितले



# अरण्यऋषी मारूती चित्तमपल्ली यांच्या स्मरणार्थ चौल भोवाळे परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम

### वनविचारांचे बीज पेरणाऱ्या साहित्यिकाला निसर्गातील सन्मान...

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

चौल, रेवदंडा निसर्ग आणि जंगलाचे बारकाईने निरीक्षण करून त्या अनुभवांना साहित्यातून रसाळपणे मांडणारे 'अरण्यऋषी' म्हणून ओळखले जाणारे पद्मश्री पुरस्कार प्राप्त लेखक आणि वनाधिकारी श्री. मारुती चित्तमपल्ली यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी चौल भोवाळे घूमट परिसरात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम उद्या, रविवार, २९ जून रोजी सकाळी आयोजित केला असून, निसर्गप्रेमी संस्था – चौल, वनविभाग – अलिबाग, कृषक कल्याणकारी संस्था – ओएसिस रेवदंडा आणि भगवती ग्रुप





यांच्या संयुक्त विद्यमाने तो पार पडणार आहे.नुकत्याच निधन पावलेल्या मारुती चित्तमपल्ली सरांचा जीवनप्रवास अत्यंत प्रेरणादायी होता. सोलापूर जिल्ह्यात जन्मलेले चित्तमपल्ली यांनी वनखात्यात अधिकारी म्हणून कार्यरत असताना केवळ प्रशासकीय नजरेने नव्हे, तर एक संवेदनशील लेखक आणि निसर्गप्रेमी म्हणून जंगलाचा सखोल अभ्यास केला. त्यांच्या लेखनात फक्त निसर्ग नव्हे, तर तो अनुभवणारा आणि समजून घेणारा माणूसही दिसतो. त्यामुळेच 'निसर्ग साहित्याचे ज्येष्ठ ऋषी' म्हणून त्यांना अरण्यऋषी म्हणणे योग्य ठरते.भारत सरकारने त्यांच्या कार्याचा गौरव करत पद्मश्री पुरस्काराने त्यांचा सन्मान केला होता. त्यांच्या अनेक पुस्तके आजही निसर्गप्रेमींसाठी प्रेरणास्थान ठरतात. चित्तमपल्ली सरांनी काही वर्षांपूर्वी चौल-रेवदंडा परिसरालाही भेट दिली होती. त्यावेळी स्थानिक ग्रामस्थांसोबत जंगलातील त्यांच्या रम्य अनुभवांचा गप्पांमधून आदान-प्रदान झाला होता.

त्यांच्या स्मरणार्थ होणाऱ्या या वृक्षारोपण कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे नव्या पिढीत निसर्गाविषयी आत्मियता निर्माण करणे. अरण्यऋषींच्या कार्याला खरी मानवंदना ही त्यांच्या प्रिय जंगलाचा विस्तार करूनच होऊ शकते, हे जाणूनच हा उपक्रम राबविण्यात येत आहे.चौल व रेवदंडा परिसरातील सर्व ग्रामस्थ, युवक मंडळे, विद्यार्थी आणि निसर्गप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आयोजकांचे आवाहन आहे.हा वृक्षारोपण कार्यक्रम केवळ पर्यावरण पूजन नसून, अरण्यऋषींच्या विचारांचे रोपण आहे. त्यातून पुढील पिढ्यांसाठी एक हरित आणि संवेदनशील विचारसंपन्न वारसा आपण तयार करू शकतो.

## वीर वाजेकर महाविद्यालय आणि केमिशिया फार्मास्युटिकल तळोजा यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण अभियान

**दैनिक युवक आधार**
**कॉलेज कट्टा/आरती सुरवसे**

पर्यावरण संवर्धन व शाश्वत हरित उपक्रमांच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, फुंडे यांनी केमिशिया फार्मास्युटिकल, तळोजा यांच्या सहकार्याने वृक्षारोपण मोहीम राबवली. ही मोहीम प्राणीशास्त्र आणि रसायनशास्त्र विभाग यांच्यामार्फत समझोता करार अंतर्गत राबविण्यात आली. या अभियानात सुमारे 135 वृक्षांचे रोपण करण्यात आले. मधुमालती, करंज, काजू, अर्जुन, बदाम, बहावा, फणस, तामण, वड, आणि जांम यांसारख्या लोकोपयोगी व पर्यावरणदृष्ट्या महत्त्वाच्या वृक्षांचे रोपण करण्यात आले. हे सर्व रोपे केमिशिया फार्मास्युटिकल, तळोजा यांनी CSR उपक्रमांतर्गत भेट केली होती. वृक्षारोपण करण्यात स्थळांमध्ये तु. ह. वाजेकर विद्यालय (फुंडे), टाकीगाव, बापदेव मंदिराजवळील वनक्षेत्र आणि इतर नैसर्गिक परिसरांचा समावेश होता. या उपक्रमा साठी केमिशिया फार्मास्युटिकलचे संचालक दीपक पवार आणि संतोष शिंदे आणि वीर वाजेकर महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शन करताना वनसंवर्धन, जैवविविधतेचे



रक्षण आणि तरुणांनी पर्यावरणासाठी जबाबदारीने काम करणे यावर भर दिला. तु. ह. वाजेकर विद्यालयाचे प्राचार्य साळुंखे सर, थोरात मॅडम, बाबर मॅडम, पाटील सर, सदानंद म्हात्रे सर डॉ. अनिल पळवे (प्रमुख, रसायनशास्त्र विभाग) डॉ. राहुल पाटील,डॉ. जी. सी. वधवा,श्री. राम गोसावी (NSS अधिकारी) व डॉ. राजकुमार कांबळे (NCC अधिकारी), NSS स्वयंसेवक व NCC कॅडेट्स, डॉ. संदीप घोडके श्री. गजानन चव्हाण सर फोन सामाजिक संस्थेचे श्री निकेतन ठाकूर केमिशिया फार्मास्युटिकलचे सुमारे 15 कर्मचारी व महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी श्री पंढरीनाथ घरत, श्री आंबवकर श्री सौरव सकपाळ या उपक्रमात सक्रीय सहभागी झाले .होते.

## वाघळूद येथील त्या घटनेतील आरोपी अद्याप फरार शिरपूर पोलिसांच्या कार्यशेलीवर प्रश्नचिन्ह.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**

शिरपूर पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या वाघळुद येथील तरुणीने गावातील एका तरुणाच्या त्रासाला कंटाळून वीश घेतले होते. उपचारादरम्यान तरुणीचा मृत्यू झाला एवढा गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल असून सदर घटनेतील आरोपी अजूनही फरार आहे. त्यामुळे शिरपूर पोलिसांच्या कार्य शेल्यीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. शिरपूर पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या वाघळूद येथे त्याच गावातील एका तरुणाच्या त्रासाला कंटाळून अल्पवयीन मुलीने विष प्राशन केल्याची घटना दि 21. जून रोजी घडली होती. अभिषेक विष्णू देशमुख असे आरोपीचे नाव आहे. विष प्राशन केल्यानंतर सदर मुलीला वाशिम येथील क्रिटिकल हॉस्पिटलमध्ये उपचाराकरिता भरती करण्यात आले होते. परंतु उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला होता. मुलीच्या मृत्यूनंतर मुलीचे काका गोपाल धनंजय आवटे यांनी शिरपूर पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दाखल केली होती. तक्रारी मध्ये नमूद करण्यात आले होते की आरोपी हा माझ्या पुतणीच्या घरात जाऊन तिला त्रास देत म्हणाला तू माझ्यासोबत पळून चाल तू




शिरपूर पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या वाघळूद येथील घटना.. ठाणेदार केशव वाघ घेत आहेत झोपेत सोंग.

जर माझ्यासोबत पळून आली नाहीस तर मी तुझी बदनामी करीन व तुला जीवाने मारून टाकीन. या त्रासाला कंटाळून 21 जून रोजी विष प्राशन केले. त्यानंतर तिला वाशिम क्रिटिकल हॉस्पिटलमध्ये भरती करण्यात आले. परंतु उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. मुलीचे काका आवटे यांच्या तक्रारीवरून शिरपूर पोलीस स्टेशन मध्ये पोस्को कायद्याअंतर्गत विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एवढ्या गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल असून आरोपी मात्र अजूनही फरार आहे. त्यामुळे शिरपूर पोलिसांच्या कार्य शैलीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# कळंबोली येथे छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगणावर पावसाळी क्रिकेट च्या माध्यमातून वृक्षारोपण

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

कळंबोली मधील सेक्टर-1 के.एल.ई कॉलेजच्या बाजूच्या छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर क्रिकेट व ईतर मैदानी खेळ खेळले जातात कळंबोली मधील क्रिकेट सामन्यांसाठी प्रसिद्ध असलेल्या या मैदानावर कळंबोली गावचे माजी सरपंच स्व.मनोहर खानावकर यांचे स्मरणार्थ वृक्षारोपण व पावसाळी सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. पनवेल पालका क्षेत्रामध्ये सध्या मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड सुरू आहे. या वृक्ष लागवडीला प्रोत्साहन देण्यासाठी पनवेल महापालिकेने मोफत रोपे देण्याचे आयोजन केले आहे. तसे आवाहन पालिकेने नागरिकांना केले आहे. हरित पट्टा करण्याच्या अनुषंगाने पालिकेने हे



पाऊल उचलले असून त्याला प्रतिसाद म्हणून कळंबोली प्रभाग 10 चे माजी नगरसेवक विजय खानावकर यांनी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्याचे योजिले आहे. त्याचाच भाग म्हणून रविवार ता.29 जून रोजी क्रिकेट प्रेमी व खेळाडू तसेच कळंबोली मधील नागरिकांनी या मैदानाच्या चहुबाजुला वृक्षारोपण केले. या ठिकाणी शोभेची झाडे न लावता मोठी सावली देणारी झाडे लावण्यात आली आहेत. या मैदानावर वर्षभर काही ना काही खेळ

शरीर तंदुरुस्ती साठी खेळ महत्त्वाचा आहे. तसेच पर्यावरण रक्षणाची व झाडे लावून ती जोपासन्याची गरज आहे. झाडे लावताना जागा वेळ कार्यक्षेत्र हद्दी न बघता कुणालाही न जुमानता अमर्याद झाडे लावा त्याच तुम्हाला फळ भेटलं नाही तरी चालेल पण त्यातून भेटनारा ऑक्सिजन तुम्हाला नक्की भेटेल

**विजय खानावकर**
**मा.नगरसेवक पनवेल महापालिका.**

खेळले जातात. मैदानाच्या चोहोबाजुंनी झाडे लावन्यात आली आहेत.त्या मुळे भविष्यात प्रेक्षक झाडाच्या सावलीत बसून खेळाचा आनंद लुटू शकतात. लागलेल्या झाडांना उन्हाळ्यात पाण्याची कमतरता पडू नये म्हणून या ठिकाणी ठिंबक सिंचन करून जगवली जाणार असल्याचे आयोजक विजय खानावकर यांनी सांगितले. या वेळी सुधागड चे प्राचार्य राजेंद्र पालवे, माजी नगरसेवक विजय खानावकर, आंतरराष्ट्रीय टायकांडो पंच सुभाष पाटील, आयोजक हनुमंत चौधर, निलेश दिसले, आनंद माने, श्रीकांत फाळके,अजय सुर्यवंशी, संदीप खलाटे, प्रीतम पाटील, निलेश भोईर, राजेश टेबे, गुरदेव सिंग संदीप सिंग निर्भयासिंग मन, नवनाथ कोळेकर यांच्यासह संघर्ष मित्र मंडळ, श्री मित्र मंडळ, रामदास शेवाळे प्रतिष्ठान, एकता मित्रा मंडळ, जयभवानी मित्रा मंडळ शिवशंभू मित्रा मंडळ व क्रिकेट खेळाडू, शेकडो कळंबोलीकर नागरिक उपस्थित होते.

# मोदिजींच्या 'मन की बात''ला करंजाडेत उत्स्फूर्त प्रतिसाद

### रामेश्वर आंग्रे यांचे लोकनेते मा.खासदार रामशेठ ठाकूर, आ. प्रशांत ठाकूर, महेश बालदी, जेएम म्हात्रे यांनी कौतुक केले

**दैनिक युवक आधार**
**पनवेल/प्रतिनिधी --** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' या रेडिओ कार्यक्रमाचा १२३ वा भाग 29 जून रोजी प्रदर्शित झाला आहे. देशवासियांना संबोधित करताना ते म्हणाले की, यावेळी तुम्ही आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या उर्जेने भरलेले आहात. तो १० वर्षांपूर्वी सुरू झाला आणि आज तो जगभर पसरला आहे. योग दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. तसेच ग्रामीण भागातील नागरिकांना मार्गदर्शन केले व नागरिकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली. मा सरपंच रामेश्वर आंग्रे यांनी करंजाडेत अकरा ठिकाणी थेट प्रेक्षपण ठेवले होते. याला चांगला प्रतिसाद लाभला. माजी नगराध्यक्ष भाजप नेते जे.एम. म्हात्रे, गजानन पाटील, मनखुष



नाईक, नाथा भरवाड, अशोक विखारे, उमेश भोईर, मंगेश बोरकर केतन आंग्रे, ओमकार चौधरी यांच्यासह भाजप जेष्ठ नेते, युवा नेते, सदस्य, जेष्ठ नागरिक, रिक्षा चालक, शिरवी समाज यांच्यासह करंजाडेवासी उपस्थित होते. माननीय नरेंद्र मोदी हे पंतप्रधान झाल्यापासून देशवासियांना उद्देशून "मन की बात" मधुन संवाद साधतात. या कार्यक्रमाचे कौतुक संपूर्ण जगभर होते आहे. तसेच 11 वर्षे राष्ट्र सेवेची, समर्पणाची, सुशासनाची मा. पंतप्रधान मोदिजींच्या मन की बात द्वारे थेट संवाद साधला यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी त्यांच्या मासिक रेडिओ कार्यक्रम 'मन की बात'च्या १२३ व्या भागात अनेक मुद्द्यांवर चर्चा केली. या दरम्यान त्यांनी देशाला दोन मोठ्या आनंदाच्या बातम्याही दिल्या. पहिली म्हणजे, भारत आता धोकादायक डोळ्यांच्या आजारापासून पूर्णपणे मुक्त झाला आहे. दुसरे म्हणजे, आता देशातील ६४% पेक्षा जास्त लोकसंख्येला कोणत्या ना कोणत्या स्वरूपात सामाजिक सुरक्षेचा लाभ मिळत आहे. यावेळी मोदी यांचे मन की बात एकण्यासाठी करंजाडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांनी सोसायट्या, सामाजिक मंडळे आदी अकरा ठिकाणी टीव्ही स्क्रीनद्वारे थेट प्रेक्षपण आयोजित केले होते. यावेळी माजी नगराध्यक्ष भाजप नेते जे.एम.म्हात्रे यांनी कार्यक्रमाला भेट देत, रामेश्वर आंग्रे यांच्या कामाचे कौतुक केले. यावेळी करंजाडे वासियांनी चांगला प्रतिसाद दाखविला. यावेळी गजानन पाटील, मनखुष नाईक, नाथा भरवाड, शिरवी समाज नागरिकांनी मनोगते व्यक्त केले. रामेश्वर आंग्रे यांचे लोकनेते मा.खासदार रामशेठ ठाकूर, आ. प्रशांत ठाकूर, महेश बालदी, जेएमम्हात्रे यांनी कौतुक केले. मा सरपंच रामेश्वर आंग्रे यांनी मोदीजी यांच्या कार्यावर विश्वास ठेवत, भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. या प्रवेशानंतरच पहिल्यादा जोरदार कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमातर्गत चांगल्या नियोजनाबद्दल रामेश्वर आंग्रे यांचे लोकनेते मा.खासदार रामशेठ ठाकूर, आ. प्रशांत ठाकूर, महेश बालदी, जेएम म्हात्रे, माजी विरोधीपक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी कौतुक केले.

## मुसळधार पावसामुळे शेतकरी बांधवांचे झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करावे -भाजप नेते नकुल देशमुख

### -जिल्हाधिकारी श्रीमती बुवनेश्वरी एस यांना देशमुख यांचे पत्र

**दैनिक युवक आधार**
**रिसोड प्रतिनिधी.**
**रणजीत सिंह ठाकुर.**

**रिसोड-** मागील दोन दिवसापासून मुसळधार पावसाने रिसोड मालेगाव विधानसभा व वाशिम जिल्ह्यातील शेतकरी बांधवाने खरीप पिकाची केलेली पेरणी खरडून निघालेली आहे तसेच अनेक गावात संततधार पावसामुळे घरांची पडझड झालेली आहे सदर नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून शासनाकडे अहवाल पाठवावा असें पत्र भाजप रिसोड मालेगाव विधानसभा निवडणूक प्रमुख नकुल देशमुख यांनी जिल्हाधिकारी यांना दिले आहे.

दि २५ व २६ जून रोजी रिसोड मालेगाव विधानसभा मतदारसंघात अनेक गावात तसेच वाशिम जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडलेला असून पावसाचा जोर अजूनही सुरूच आहे या मुसळधार पावसामुळे रिसोड आणि मालेगाव तालुक्यातील तसेच वाशिम जिल्ह्यातील अनेक ठिकाणी नदयाना आलेल्या पुरामुळे तसेच गावालगतची अनेक नाले ओसांडून वाहत आहेत त्यामुळे पूर परिस्थितीमुळे शेतकरी बांधवांनी खरीप हंगामात काही दिवसांपूर्वीच केलेली पेरणी ही पूर्णपणे खरडून गेली असून संपूर्णतः नुकसान झाले आहे तसेच अनेक गावात घरांची पडझड झालेली असून नागरिकांना नुकसानीस सामोरे जावे लागले आहे. त्यामुळे सदर झालेल्या नुकसानीचे तात्काळ



पंचनामे करून लवकरात लवकर शेतकरी बांधवांना नुकसानीची भरपाई मिळणे गरजेचे आहे. करिता तात्काळ पंचनामे करावे व शेतकरी बांधवांना नुकसान भरपाई लवकरात लवकर मिळावी यासाठी आपल्या माध्यमातून संबंधित यंत्रनेकडून तात्काळ पंचनामे करून नुकसानीचा आवाहल शासनाकडे पाठवावा असे पत्रात नमूद आहे रिसोड मालेगाव विधानसभा मतदारसंघ तसेच वाशिम जिल्ह्यातील शेतकरी बांधवांचे नुकसान भरपाई तात्काळ मिळावी यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब, भाजप प्रदेशाध्यक्ष तथा महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब यांच्याकडे पाठपुरावा करणार असल्याचे नकुल देशमुख म्हणाले.